SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज




# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

CCTV CAMERA बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २२.०७.२०२६ | अंक नं. ०९६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02
92.50 शुध्द चांदीपासुन बनविलेले खास आपल्या लाडक्या लहान बालगोपाळांसाठी
चांदीमधील कार्टुन ग्लास, कडली, फुलपात्र, चमचा, ताट, वाटी, बाटली, कडे, पैंजण, वाळे, तोडे, मग आणि बरचं काही..

## सायबर गुन्हेगारांनी लुटलेली ४०.६८ लाखांची रक्कम नगरच्या बँकांमधून झाली विड्रॉल

### विविध बँकांचे खातेदार आणि त्यांच्या साथीदारांवर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर –देशभरातील नागरिकांची ऑनलाईन फसवणूक करून मिळवलेली तब्बल ४० लाख ६८ हजार ५५९ रुपयांची रक्कम अहिल्यानगर जिल्ह्यातील बँक खात्यांमधून काढून अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अहिल्यानगरच्या सायबर पोलीस ठाण्यात विविध ११ बँक खातेदार, चेक आणि एटीएमद्वारे पैसे काढणारे अज्ञात इसम व त्यांच्या साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १८ ऑगस्ट २०२५ ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत देशभरात झालेल्या विविध सायबर फसवणुकीतील रक्कम अहिल्यानगर जिल्ह्यातील काही बँक खात्यांमध्ये वर्ग झाली होती. सायबर गुन्हेगारांशी संगनमत करून या खात्यांचे संचालक, खाते हाताळणारे आणि त्यांच्या साथीदारांनी चेक व एटीएम विड्रॉलद्वारे ही सर्व रक्कम स्वतः च्या फायद्यासाठी तातडीने काढून घेतली.

तपासात आरोपींनी कट रचून ही फसवणुकीची रक्कम स्वतःच्या बँक खात्यात वळवून घेत नागरिकांची मोठी फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

याबाबत सायबर पोलीस ठाण्यातील पो.कॉ. अमोल आव्हाड यांनी सरकार तर्फे फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून सायबर पोलिसांनी विविध ११ जणांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८(४), ३१९(२) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी), (डी) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या आंतरराज्यीय व्याप्ती असणाऱ्या सायबर गुन्ह्याचा पुढील तपास सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले करत आहेत.

आठरे पाटील मेमोरियल हॉस्पिटल
नोकरीच्या शोधात आहात का ? अहिल्यानगर मधील नामांकित हॉस्पिटलमध्ये संधी तुमची वाट पाहतेय !
तात्काळ भरती सुरु आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १. | वॉर्ड बॉय | ३ | किमान १०वी उत्तीर्ण |
| २. | आया | ३ | अनुभवींना प्राधान्य |
| ३. | स्विपर (Female) | २ | अनुभवींना प्राधान्य |
| ४. | नर्स (GNM / B.Sc) | ८ | GNM किंवा B.Sc नर्सिंग |
| ५. | सिनियर आर एम ओ | ३ | BAMS / BHMS |
| ६. | ओटी असिस्टंट | २ | अनुभवींना प्राधान्य |
| ७. | रिसेप्शनिस्ट | २ | किमान १२वी, कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक |
| ८. | फार्मासिस्ट | ३ | D.Pharm / B.Pharm |

इच्छुक उमेदवारांनी आपली शैक्षणिक कागदपत्रे घेवून खालील पत्यावर सकाळी १० ते संध्याकाळी ७ बाजेपर्यंत भेटावे.
* फ्रेशर आणि अनुभवी दोघेही अर्ज करू शकतात. * अनुभवानुसार आकर्षक वेतन
झोपडी कॅन्टीन समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर मोबाईल : ७४९८१८०५८५

## भरदिवसा घर फोडून दीड लाखांचे सोन्याचे दागिने अन् रोकड लंपास

### एकवीरा चौक परिसरातील घटना, अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर – सावेडी उपनगरातील एकवीरा चौक परिसरात असणाऱ्या वृद्धेश्वर कॉलनीत भरदिवसा एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे दागिने आणि रोख रक्कमेसह तब्बल १ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत मूळचे लाख (ता. राहुरी) येथील रहिवासी व सध्या एकविरा चौक, सांदिपनी क्लासेसच्या मागे, वृद्धेश्वर कॉलनी (अहिल्यानगर) येथे राहणारे अविनाश नानासाहेब खाडे (वय ३५) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी खाडे यांचे घर २० जुलै रोजी सकाळी १० ते २१ जुलै रोजी सकाळी ९ वाजेच्या दरम्यान बंद होते. याच कालावधीत अज्ञात चोरट्याने खाडे यांच्या बंद घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप कशाच्या तरी सहाय्याने तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटाच्या लॉकरमध्ये प्लास्टिकच्या डब्यात ठेवलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.

हा प्रकार लक्षात आल्यानंतर अविनाश खाडे यांनी तात्काळ तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. खाडे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ), ३३१ (३), ३३१ (४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे आणि तोफखान्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील करत आहेत.

१३ वे पुण्यस्मरण



स्व. कमलाबाई सुवालालजी गुगळे
स्व. दि. २३ जुलै २०१३

शोधुन मिळत नाही पुण्य,
सेवार्थाने व्हावे लागते धन्य..
कोण आहे तुझ्याविना अन्य ?
आई तुजविण आमचं जग आहे शून्य

बाई, तुझ्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !

सौ. साधना अभय गुगळे | सौ. श्रुती अभिजीत गांधी
सौ. कल्पना अजित गुगळे | सौ. सारीका सोहन गुगळे
सौ. आशा ईश्वरलाल मुनोत | सौ. श्रध्दा हर्षल गुगळे
सौ. लक्ष्मी रोनक गुगळे
आशिष, आदित्य, नेत्रा, परम, आरव, ह्दा, रुवी, एवम् समस्त गुगळे परिवार
SBG एसबीजी ट्रेडर्स
जुना दाणेडबरा, अ.नगर

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे | महिलांसाठी पादत्राणे | मुलांसाठी पादत्राणे
क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स, स्नीकर्स, कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज, स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल, बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरसाठी (ग्रूम) पादत्राणे वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका! ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता! लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
शू पॅलेस सारडागल्ली, अ.नगर मो : 9881531536

## हातचलाखी करून दुकानदाराची सोन्याची अंगठी एकाने लांबवली

नगर – दुकानदाराच्या नकळत हातचलाखी करून सोन्याची अंगठी लांबवल्याची घटना शहरातील चाणक्य चौक परिसरात घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात भामट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रतीलाल भगवानदास गुगळे (वय ७८, रा. चाणक्य चौक, बुरुडगाव रोड) यांनी फिर्याद दिली आहे. स्टेशनरी व्यावसायिक असलेले फिर्यादी गुगळे हे २१ जुलै रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास चाणक्य चौकातील 'सुपर झेरॉक्स शॉप' या दुकानात कामात असताना ही घटना घडली. एका अज्ञात इसमाने रतीलाल गुगळे यांच्याशी संभाषण करत हातचलाखी केली आणि त्यांच्या हातातील १० ग्रॅम वजनाची, सुमारे ४० हजार रुपये किमतीची चौकोनी आकाराची सोन्याची अंगठी चोरून नेली.

आपली सोन्याची अंगठी चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर रतीलाल गुगळे यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली.

त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार केकाण या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

Become a COMPUTER PROFESSIONAL
An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE
PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT
DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM
Enroll Now www.dishagroup.in
दिल्ली गेट शाखा — आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर. 9371051769
जुने बस स्टँड शाखा — अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी, अ.नगर. 9371151769
पाईपलाईन शाखा — रुचा गार्डन बिल्डिंग, मिस्त्रीबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अहिल्यानगरमध्ये गोमांस विक्री करणाऱ्याला पोलिसांनी पकडले

नगर - महाराष्ट्रात गोवंशीय प्राण्यांच्या हत्येवर आणि गोमांस विक्री करण्यास कायदेशीर बंदी असतानाही, नगर शहरात बेकायदेशीरपणे गोमांस बाळगून त्याची विक्री करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका इसमावर कोतवाली पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी ४० किलो गोमांस आणि कत्तलीसाठी वापरण्यात येणारी हत्यारे जप्त केली आहेत.

कोतवाली पोलीसांना २१ जुलै रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास नगर शहरातील झेंडीगेट परिसरातील इस्लामीया खानवळ या हॉटेलच्या वरच्या मजल्यावरील घरात बेकायदेशीर गोमांस साठा आणि कत्तल सुरू असल्याची गुप्त बातमी मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने तात्काळ त्या ठिकाणी छापा टाकला असता, आरोपी नदीम सय्यद अन्वरअली (वय ३३, रा. झेंडीगेट चौक, अहिल्यानगर) हा गोवंशीय प्राण्याचे मांस व कटाईचे साहित्य बाळगताना आढळून आला.

या कारवाईत पोलिसांनी १० हजार ५०० रुपये किमतीचे ४० किलो गोमांस, तसेच १ लोखंडी सत्तूर आणि १ सुरा असा मुद्देमाल जप्त केला आहे. सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण होईल अशा रीतीने बेकायदेशीर गोमांस बाळगल्याप्रकरणी पोलीस अंमलदार सत्यजीत शिंदे यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २७१ सह महाराष्ट्र पशुसंरक्षण सुधारणा कायद्यान्वये कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# नगरमधील एमडी ड्रग्ज तस्करी रॅकेटमध्ये आणखी तिघांचा सहभाग असल्याचे उघड

**पोलिसांनी केली अटक, न्यायालयाने सुनावली २४ जुलैपर्यंत पोलीस कोठडी**

नगर - नगरमध्ये १५० ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) जप्त झालेल्या प्रकरणात तोफखाना पोलिसांनी आणखी तिघांना अटक केली आहे. या तिघांचा मुकुंदनगरसह शहरातील विविध भागांत ड्रग्ज विक्री करण्यामध्ये सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. न्यायालयाने तिनही संशयित आरोपींना २४ जुलैपर्यंत कोठडी सुनावली असून, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि ड्रग्ज पुरवठ्याची संपूर्ण साखळी उघड करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

अली शकील शेख (वय १९, रा. गोविंदपुरा), दानिश फारूख शेख (वय २९, रा. जुना घासगल्ली) आणि कासिफ सज्जाद खान (वय २६, रा. जुना मुकुंदनगर) अशी नव्याने अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

यापूर्वी अटक करण्यात आलेले झिशान सय्यद, रेहान शेख आणि वसीम बागवान यांच्या चौकशीतून या तिघांची नावे समोर आली. यानंतर पोलिसांनी सोमवारी रात्री उशिरा कारवाई करून या तिघांना ताब्यात घेत अटक केली. रविवारी (१९ जुलै) तोफखाना पोलिसांचे गुन्हे शोध पथक सावेडी परिसरात गस्त घालत असताना मिस्किनमळा येथे एक कार संशयास्पदरीत्या फिरताना आढळली. पोलिसांनी वाहन अडविण्याचा प्रयत्न केला असता दोन जण घटनास्थळावरून पसार झाले, तर झिशान सय्यद, रेहान शेख आणि वसीम बागवान यांना ताब्यात घेण्यात आले. वाहनाची झडती घेतली असता सुमारे १५० ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला.

याशिवाय पिस्तुलासारखे दिसणारे लायटर, एअर गन, मास्क, कटावणी तसेच दरोड्यासाठी वापरता येईल असे साहित्यही पोलिसांनी हस्तगत केले. मंगळवारी संशयित आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले. ड्रग्जचा मूळ पुरवठादार कोण, शहरात ड्रग्जचा साठा कुठून आणला जातो, या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, तसेच पसार असलेल्या जमीर निसार शेख आणि इतर संशयितांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पोलीस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने ती मान्य करत तिन्ही संशयित आरोपींना २४ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. प्राथमिक चौकशीत अटक केलेल्या संशयित आरोपींनी हे ड्रग्ज जमीर शेख (रा. मुकुंदनगर) याच्याकडून मिळाल्याची कबुली दिली. त्यानंतर तपासाची दिशा बदलली. पुढील चौकशीत मुकुंदनगरसह शहरातील विविध भागांत एमडीची विक्री करणार्यांची नावे समोर आली. त्यानुसार पोलिसांनी अली शेख, दानिश शेख आणि कासिफ खान यांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली. तपासात त्यांचा ड्रग्ज विक्रीमध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली.

नगर शहरात एवढ्या मोठ्या प्रमाणात एमडी जप्त होण्याची ही पहिलीच घटना आहे. संशयास्पद कारवरून सुरू झालेल्या कारवाईतून शहरात सक्रिय असलेल्या ड्रग्ज रॅकेटचे धागेदोरे समोर आले असले, तरी या रॅकेटचा मुख्य सूत्रधार अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही. त्यामुळे शहरात ड्रग्जचा पुरवठा नेमका कुठून होत आहे, त्यामागे कोणते मोठे नेटवर्क कार्यरत आहे आणि त्यात आणखी किती जण सहभागी आहेत, याचा उलगडा करणे तपास यंत्रणेसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

# बनावट वैद्यकीय व्यवसायाचा पर्दाफाश, बोगस डॉक्टराविरुद्ध गुन्हा दाखल

**शासनमान्यता नसताना नागरिकांवर उपचार करून त्यांच्या आरोग्याशी सुरु होता खेळ**

श्रीरामपूर - कोणतीही वैध वैद्यकीय पदवी अथवा शासनमान्यता नसताना नागरिकांवर उपचार करून त्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या एका कथित बोगस डॉक्टराविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शहरातील अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. श्रीरामपूर शहरातील वॉर्ड क्रमांक ३ येथील गजानन क्लिनिकमध्ये एक व्यक्ती बेकायदेशीररीत्या वैद्यकीय व्यवसाय करत असल्याची तक्रार नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष सुभाष वैरागड यांच्याकडे प्राप्त झाली होती. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर संबंधित क्लिनिकमध्ये विश्वास खैरनार हा डॉ. सुवर्णा खैरनार यांच्या नावाचा वापर करून त्यांच्या खुर्चीवर बसून रुग्णांची तपासणी करत असल्याचे निदर्शनास आले.

तसेच त्यांच्या लेटरपॅडचा वापर करून रुग्णांना औषधे देत असल्याचेही तपासात स्पष्ट झाले. याप्रकरणी डॉ. संतोष वैरागड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७१०/२०२६ नोंद करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८ तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम, १९६१ मधील कलम ३३ (२) अन्वये २१ जुलै २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईनंतर श्रीरामपूर शहर पोलीस आणि तालुका आरोग्य विभागाने नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. कोणत्याही व्यक्तीकडून उपचार घेण्यापूर्वी संबंधित डॉक्टरांची वैद्यकीय पात्रता आणि नोंदणीची खात्री करूनच उपचार घ्यावेत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

तसेच परिसरात अनधिकृत किंवा संशयास्पदरीत्या वैद्यकीय व्यवसाय करणारी व्यक्ती आढळल्यास त्याची माहिती तात्काळ पोलीस किंवा आरोग्य विभागाला देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ही संयुक्त कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे आणि नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहेत.

# इन्स्टाग्रामवरून तरुणीला अश्लील मेसेज पाठवत विनयभंग; अज्ञात व्यक्तीविरोधात सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करून तरुणीला अश्लील मेसेज पाठवून तिचा विनयभंग करत तिला मानसिक त्रास दिल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चिंचपूर इजादे (ता. पाथर्डी) येथील रहिवासी असलेल्या २४ वर्षीय तरुणीच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर एका बनावट (फेक) अकाऊंटवरून अश्लील मेसेजेस पाठवण्यात येत होते. आरोपीने 'vaishuk6288' या बनावट इन्स्टाग्राम आयडीवरून तरुणीला मेसेज करून संभाषण सुरु केले. त्यानंतर आरोपीने तिला वारंवार अत्यंत अश्लील आणि लज्जास्पद मेसेज पाठवून त्रास देण्यास सुरुवात केली.

या प्रकारामुळे संतप्त आणि भयभीत झालेल्या तरुणीने नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. पीडितेच्या फिर्यादीवरून सायबर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ७५ सह आयटी क्ट ६६ (सी), ६७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले करत आहेत.

# आर्थिक गुन्हे शाखेतील पोलीस अंमलदार दिनेश राठोड निलंबित

**शेअर मार्केट घोटाळ्यात गुंतवणूकदारांकडे लाखो रूपयांची मागणी केल्याचा व्हिडिओ सोशल मिडियावर झाला होता व्हायरल**

नगर - शेवगाव येथील बहुचर्चित शेअर मार्केट घोटाळ्याच्या तपासादरम्यान गुंतवणूकदारांकडून लाखो रुपयांची लाच मागितल्याच्या गंभीर आरोपांनंतर आर्थिक गुन्हे शाखेतील पोलीस अंमलदार दिनेश राठोड याला निलंबित करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी २१ जुलै रोजी रात्री याबाबतचे आदेश काढले. या कारवाईमुळे जिल्हा पोलीस दलात खळबळ उडाली असून, आर्थिक गुन्ह्यांच्या तपासाच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शेवगाव येथील कोट्यवधी रुपयांच्या शेअर मार्केट घोटाळ्याची राज्यभरात मोठी चर्चा झाली होती. जादा परताव्याचे आमिष दाखवून अनेक गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याचा आरोप असून, या प्रकरणात शेवगाव पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल आहेत. काही गुन्ह्यांची व्याप्ती मोठी असल्याने त्यांचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. मात्र तपासादरम्यानच संबंधित गुंतवणूकदारांकडून पैसे उकळण्याचा प्रकार सुरू असल्याचे आरोप पुढे आले. गुंतवणूकदारांच्या म्हणण्यानुसार, अंमलदार दिनेश राठोड याने वारंवार व्हॉट्सॲप कॉल करून त्यांच्याशी संपर्क साधला. चौकशीच्या नावाखाली नोटिसा बजावून भेटण्यासाठी बोलावण्यात आले. त्यानंतर, तुम्हालाही या गुन्ह्यात आरोपी केले जाईल, अशी भीती दाखवत स्वतः सह वरिष्ठ अधिकार्यांसाठी लाखो रुपयांची मागणी केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या आरोपांबाबत काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली. संबंधित गुंतवणूकदारांनी पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर अपर पोलीस अधीक्षकांकडून या तक्रारीची चौकशी करण्यात आली. चौकशी अहवालात प्रथमदर्शनी आरोप गांभीर्याने घेण्याजोगे असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिनेश राठोड याला निलंबित करण्याचा निर्णय घेतला.

# वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर - अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत डोक्याला गंभीर दुखापत झालेल्या एका व्यक्तीचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सावेडीतील एकविरा चौक परिसरात घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

अनिल दगडू कोटा (वय ४८, रा. पद्मानगर, हडको, ता. जि. अहिल्यानगर) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २० जुलै रोजी रात्री पावणेनऊ वाजेच्या सुमारास सावेडी उपनगरातील एकविरा चौकातून जात असताना एका अज्ञात वाहनाने अनिल कोटा यांना जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने ते रक्ताच्या थारोळ्यात पडले. अपघाताची माहिती मिळताच त्यांचे नातेवाईक यांनी त्यांना तात्काळ उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले.

मात्र, रुग्णालयात उपचार सुरू असतानाच २१ जुलै रोजी सकाळी १०.०६ वाजेच्या सुमारास अनिल कोटा यांची प्राणज्योत मालवली. रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ईश्वर कणसे यांनी तोफखाना पोलिसांना याबाबत माहिती दिली. त्यावरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पो. ना.जिजाबाई खुडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# लोकशाहीवरील उपरोधिक भाष्य करणारे 'मंकी बात' प्रथमच अहिल्यानगरात

**ऊर्जा रंगभवन येथे २५ जुलै रोजी दोन प्रयोग; सत्ता, स्वार्थ आणि भ्रष्ट व्यवस्थेवर प्रभावी व्यंग**

नगर - सध्याच्या लोकशाही व्यवस्थेतील सत्तासंघर्ष, स्वार्थी राजकारण, भ्रष्टाचार आणि सामान्य नागरिकांच्या संघर्षावर उपरोधिक भाष्य करणारे गाजलेले व्यंगनाट्य मंकी बात प्रथमच अहिल्यानगरकरांच्या भेटीला येत आहे. समाजातील वास्तवावर मार्मिक भाष्य करत प्रेक्षकांना हसवतानाच विचार करायला भाग पाडणारे हे नाटक २५ जुलै रोजी ऊर्जा रंगभवन येथे रंगणार आहे. नाटकाचे दोन प्रयोग आयोजित करण्यात आले असून पहिला प्रयोग सायंकाळी ६ वाजता तर दुसरा रात्री ८.३० वाजता होणार आहे. सन्मानिकांसाठी ९३२५५६७१०० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शीर्षकाप्रमाणेच मंकी बातमध्ये जंगलातील माकडांच्या जीवनचक्राच्या माध्यमातून सत्तेचा खेळ आणि अस्तित्वासाठीचा संघर्ष प्रभावीपणे उलगडण्यात आला आहे. जंगलराज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यवस्थेत बलवान तोच टिकतो या तत्त्वाचा समाजव्यवस्थेशी जोडलेला संदर्भ नाटकातून अत्यंत प्रभावी रूपकाच्या स्वरूपात मांडण्यात आला आहे. त्यामुळे लोकशाहीतील अनेक विसंगती आणि सत्तेचे वास्तव प्रेक्षकांसमोर जिवंतपणे उभे राहते.




भ्रष्ट व्यवस्था, सत्तेचा गैरवापर आणि त्याचा सामान्य माणसाच्या आयुष्यावर होणारा परिणाम यांचे मार्मिक चित्रण या नाटकात करण्यात आले आहे. उपरोधिक संवाद, प्रभावी अभिनय, प्रतीकात्मक मांडणी आणि आशयघन सादरीकरणामुळे हे नाटक प्रेक्षकांचे केवळ मनोरंजन करत नाही, तर त्यांना आत्मपरीक्षण आणि सामाजिक वास्तवाचा विचार करण्यासही प्रवृत्त करते.

या नाटकाची निर्मिती अध्ययन भारतीच्या ग्रो थिएटर, वर्धा यांनी केली असून दिग्दर्शन हरीष इथापे यांचे आहे. संवादलेखन शाम पेठकर आणि हरीष इथापे यांनी केले आहे. नेपथ्य किमया पोहाणे, संगीत जैद हसन, गीतरचना प्रतीक बुडूकले, प्रकाशयोजना सुहास नगराळे आणि वेशभूषा मिनल इथापे यांनी सांभाळली आहे.

नाटकात आकाश पांडे, शरीफ पठाण, आविष्कार ठाकूर, हर्षवर्धन मानेकरी, दीक्षा उजागरे, रसिका मुळे, हास्या हलुले, तेजस ढोबळे, किमया गिरी, प्रगती बांगडकर, संहिता इथापे, चिंदबरम अक्कल आणि प्रतीक बुडूकले यांनी विविध भूमिका साकारल्या आहेत. त्यांच्या प्रभावी अभिनयातून व्यंग, विनोद आणि सामाजिक वास्तव यांचा सुरेख संगम प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे.

अहिल्यानगरातील या प्रयोगासाठी ऊर्जा रंगभवन, सतीश लोटके, पी. डी. कुलकर्णी, श्याम शिंदे, पवन श्रीकांत नाईक आणि ज्ञानेश शिंदे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. सामाजिक जाणिवा जागृत करणाऱ्या या आशयघन व्यंगनाट्याला अहिल्यानगरातील रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## प्रकाश कुलकर्णी यांचे हृदयविकाराने निधन



नगर - गुलमोहोर रोड येथील रहिवासी प्रकाश लक्ष्मण कुलकर्णी (वय ७६) यांचे २१ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ बहीणी असा परिवार आहे. नलिनी कुलकर्णी यांचे ते पती, तपस यांचे वडील तर जयंती कुलकर्णी, मिनाक्षी कुलकर्णी यांचे बंधू होत.

## आनंद (नंदू) गड्डम यांचे हृदयविकाराने निधन



नगर - श्रमिकनगर येथील रहिवासी आनंद (नंदू) नारायण गड्डम (वय ६०) यांचे २१ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. अंत्यसंस्कार २२ जुलै रोजी नालेगाव अमरधाम येथे करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ भाऊ, भावजय, पुतणे, पुतण्या, १ मुलगी, जावई असा परिवार आहे. श्रीनिवास गड्डम यांचे वडील होत.

## चतुराबाई मेहेत्रे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी चतुराबाई बारकू मेहेत्रे (वय ७५) यांचे २१ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. बाबासाहेब (बंडू) बारकू मेहेत्रे यांच्या त्या मातोश्री होत.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# भिंगारमध्ये धारदार सत्तूर बाळगणारा तरुण अटकेत

नगर - सार्वजनिक ठिकाणी धारदार लोखंडी शस्त्र (सत्तूर) बाळगल्याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी एका तरुणाविरोधात कारवाई केली आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध आर्म ॲक्टनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

भिंगार येथील राम मंदिराच्या भिंतीजवळ असलेल्या मोकळ्या जागेत २१ जुलै रोजी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास एक तरुण संशयास्पदरित्या थांबला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार प्रमोद लहारे यांनी पथकासह जाऊन पाहणी केली असता, अभिषेक अशोक शेलार (वय २३, रा. भीमनगर, भिंगार) हा तरुण त्याच्या ताब्यात धारदार लोखंडी सत्तूर बाळगताना आढळून आला.

पोलिसांनी तत्काळ त्याच्या ताब्यातील सत्तूर जप्त केला आहे. पोलीस अंमलदार प्रमोद लहारे यांच्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आरोपी अभिषेक शेलार याच्याविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम (आर्म ॲक्ट) ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गजानन कॉलनी येथून मोटारसायकलची चोरी

नगर - एमआयडीसी परिसरातील गजानन कॉलनी येथून हिरो होंडा कंपनीची पॅशन मोटारसायकल (क्र. एमएच १६ एच ४२०३) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २१ जुलै रोजी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

याप्रकरणी प्रशांत पंढरीनाथ सोनुले (वय ३८ वर्षे, रा. गजानन कॉलनी, ता. जि. अहिल्यानगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (ब) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# दिल्ली येथील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अण्णा हजारेंचे २३ जुलैला नगरमध्ये मौन धरणे आंदोलन



नगर - दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर लोकशाहीत संवादाऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला जात असल्याबद्दल चिंता व्यक्त करत, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या उपस्थितीत मौन धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. हे आंदोलन २३ जुलै रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत गांधी स्मारक, वाडिया पार्क, अहिल्यानगर येथे होणार आहे.

आंदोलनस्थळाला प्रतीकात्मक स्वरूपात नगरचे जंतर मंतर असे नाव देण्यात आले आहे. दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या परिस्थितीत लोकशाही मूल्यांचे संरक्षण, विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत संवेदनशीलता आणि संवादातून मार्ग काढण्याची गरज अधोरेखित करण्यासाठी हे मौन धरणे आयोजित करण्यात आले आहे.

या आंदोलनातून दडपशाही नव्हे, संवाद हवा, विद्यार्थ्यांना न्याय मिळाला पाहिजे, लोकशाही आणि संविधानाचे रक्षण झाले पाहिजे असा शांततामय संदेश देण्यात येणार आहे.

या मौन धरणे आंदोलनात विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे प्रतिनिधी तसेच सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक अँड श्याम आसावा, अशोक सब्बन, विकास सुतार, संदीप कुसळकर, श्रीमती नंदाताई पांडुळे, तुलसीभाई पालीवाल, सतीश कांबळे, संतोष धर्माधिकारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पाझर तलावातील बेकायदेशीर पाणी उपशाविरोधात २४ जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रोश आंदोलन

नगर - पारनेर तालुक्यातील पळशी गावाच्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेचा प्रमुख स्रोत असलेल्या खांबळी पाझर तलावातून कथितरीत्या बेकायदेशीर पाणी उपसा सुरू असल्याचा गंभीर आरोप पीपल्स हेल्पलाईन आणि स्थानिक नागरिकांनी केला आहे. अनधिकृत विद्युत मोटारी, बेकायदेशीर वीजजोडण्या आणि पाइपलाइनच्या माध्यमातून तलावातील पाण्याचा उपसा होत असल्याने पळशीसह परिसरातील सुमारे २०० ते २५० ग्रामीण व आदिवासी नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या हक्कावर गदा येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, २४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'कायदाभंजक पगारहमी नोकरशाहीविरोधी जनलोक खांबळी तलाव आक्रोश आंदोलन' आयोजित करण्यात आले आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणाची माहिती लघुपाटबंधारे विभाग, महावितरण, महसूल प्रशासन आणि संबंधित यंत्रणांना वेळोवेळी देण्यात आली होती. पीपल्स हेल्पलाईनने २३ एप्रिल २०२६ रोजी लेखी तक्रार दाखल करून बेकायदेशीर पाणी उपसा तातडीने थांबविणे, अनधिकृत मोटारी व पाइपलाइन हटविणे, वीजजोडण्या तोडणे आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करणे, अशा मागण्या केल्या होत्या. मात्र, तक्रारीनंतरही कोणतीही प्रभावी कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. खांबळी पाझर तलावातील कथित बेकायदेशीर पाणी उपसा तात्काळ बंद करावा; अनधिकृत मोटारी, पाइपलाइन आणि वीजजोडण्यांची तपासणी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत; सार्वजनिक पाणीपुरवठा स्रोताभोवती आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात; तसेच तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर विभागीय कारवाई करावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

या आंदोलनासाठी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले आणि प्रकाश गोसावी यांच्यासह विविध सामाजिक कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. नागरिकांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### आरोग्यदायी भोपळ्याच्या बिया

भोपळ्याच्या बिया म्हणजे आकाराने लहान पण गुणांनी मोठ्या असणाऱ्या बिया आहेत. प्राचीन काळापासून याला 'पोषणाचा खजिना' मानले जाते आणि आता आधुनिक आहारशास्त्रानेही याला 'सुपरफूड'चा दर्जा दिला आहे. भोपळ्याच्या बिया प्रथिने, आरोग्यदायी स्निग्ध पदार्थ, मॅग्नेशियम, झिंक, लोह आणि शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध आहेत. यातील खास 'कुकुर्बिटिन' नावाचे संयुग मूत्रपिंड आणि प्रोस्टेटचे आरोग्य सुधारते, शरीरातील सूज कमी करते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवते. झोपेच्या समस्येसाठी भोपळ्याच्या बिया रामबाण आहेत कारण यातील ट्रिप्टोफान शरीरात मेलाटोनिन तयार करायला मदत करतो. हृदय निरोगी ठेवण्यासाठी आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी या बिया उत्तम आहेत, कारण यात मॅग्नेशियम आणि पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते. झिंकमुळे केस मजबूत होतात तर अँटिऑक्सिडंट्स हृदयविकार व मधुमेहासारख्या आजारांपासून बचाव करतात. वजन नियंत्रणासाठी, त्वचा तजेलदार ठेवण्यासाठी आणि हाडे मजबूत करण्यासाठी भोपळ्याच्या बियांचा उपयोग होतो. आयुर्वेदात भोपळ्याच्या बियांना वात-पित्त शमक आणि ऊर्जा वाढवणारा पदार्थ मानले आहे. खारट भाजून, सॅलडमध्ये, स्मूदीमध्ये किंवा चटणीमध्ये अशा अनेक प्रकारे खाल्ल्या जातात. महागड्या ड्रायफ्रुट्सपेक्षा भोपळ्याच्या बिया स्वस्त, सहज उपलब्ध आणि आपल्या मातीतल्या असल्याने अधिक गुणकारी ठरतात.

## पाककला

### मोहनथाळ

**साहित्य :** जाड बेसन २ वाट्या, साजूक तूप १ वाटी, साखर १ १/२ वाटी, पाणी १/२ वाटी, दूध २ चमचे, वेलची पूड १/२ चमचा, जायफळ पूड चिमूटभर, केशर ८-१० काड्या, बारीक चिरले पिस्ता २ चमचे, बारीक चिरले बदाम १ चमचा, चांदीचा वर्ख सजावटीसाठी

**कृती :** प्रथम साखर आणि पाण्याचा एकतारी पाक करा. त्यात दूध आणि केशर घालून बाजूला ठेवा. कढईत अर्धे तूप गरम करा. त्यात बेसन घालून मंद आचेवर सोनेरी रंग येईपर्यंत १५ ते २० मिनिटे भाजा. बेसन खमंग भाजले की उरलेले तूप घालून आणखी ५ मिनिटे परता. गॅस बंद करा. थोडे कोमट असतानाच त्यात तयार पाक हळूहळू घाला आणि भरपूर ढवळा. वेलची पूड, जायफळ पूड घाला. ताटाला तूप लावा आणि मिश्रण त्यात ओतून सारखे करा. वरून पिस्ता, बदाम आणि चांदीचा वर्ख लावा. पूर्ण थंड झाल्यावर चौकोनी वड्या कापा. गुजराती आणि मारवाडी सणांमध्ये मोहनथाळ खास बनवला जातो. तुपाचा सुगंध आणि दाणेदार पोत यामुळे तो खूपच रुचकर लागतो. १० ते १२ दिवस टिकतो.

## वास्तू

### कोहळा कधी लावावा?

✻ अमावस्येच्या दिवशी सकाळी लवकर स्नान करून, घर-दुकान स्वच्छ करून मगच नवीन नारळ-कोहळा लावा. सूर्योदय ते दुपारी १२ च्या आत लावणे शुभ मानले जाते. पूर्ण नारळावर हळद-कुंकू लावून काळ्या दोऱ्यात ७ वेळा गुंडाळावे. त्यात ४ लवंगा खोवून दरवाजावर बांधावा. घरातून बाहेर तोंड करून लावावा म्हणजे नकारात्मक ऊर्जा बाहेर जाईल.

## सौंदर्य

२ चमचे मेथी रात्री १ ग्लास पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी ते पाणी गाळून घ्या. शॅम्पू केल्यानंतर शेवटच्या पाण्यात हे मेथीचे पाणी वापरा. १० मिनिटे तसेच ठेवून नंतर साध्या पाण्याने केस धुवा. आठवड्यातून २ वेळा करा. केसांचे आरोग्य सुदृढ राहते.

## सल्ला

भाजीवर आलेले तेल काढण्यासाठी १ बर्फाचा तुकडा फिरवा. तेल त्याला चिकटेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २३ जुलै २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, विशाखा २५।४३, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. १० मि.**

## राशिभविष्य

**मेष :** घरात आनंदाचे वातावरण राहील. जुनी अडकलेली कामे पूर्ण होतील.

**वृषभ :** कामाच्या ठिकाणी वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. नवीन जबाबदारी सोपवली जाईल. प्रवासाचे योग आहेत.

**मिथुन :** मन प्रसन्न राहील. मित्रांकडून चांगली बातमी कळेल. शिक्षण व स्पर्धा परीक्षेत यश मिळेल.

**कर्क :** कौटुंबिक चर्चेतून महत्त्वाचे निर्णय होतील. आरोग्य चांगले राहील. गुंतवणुकीसाठी दिवस अनुकूल आहे.

**सिंह :** नोकरीत बढतीची शक्यता आहे. समाजात मान-सन्मान वाढेल. जुने वाद मिटतील.

**कन्या :** व्यवसायात नफा वाढेल. नवीन ओळखी फायदेशीर ठरतील. घरासाठी मोठी खरेदी होईल.

**तूळ :** कलात्मक कामात प्रगती होईल. जोडीदारासोबत वेळ चांगला जाईल. मानसन्मान मिळेल.

**वृश्चिक :** रखडले पैसे परत मिळतील. कायदेशीर कामात गती येईल. आत्मविश्वास वाढेल.

**धनु :** धार्मिक कार्यात सहभाग घ्याल. लांबचा प्रवास सुखकर होईल. विद्यार्थ्यांना चांगले निकाल मिळतील.

**मकर :** मेहनतीचे फळ मिळेल. मालमत्तेसंबंधी कामे मार्गी लागतील. वरिष्ठांशी संबंध सुधारतील.

**कुंभ :** नवीन तंत्रज्ञान शिकण्याची संधी मिळेल. खर्चावर नियंत्रण राहील. सामाजिक कार्यात नाव होईल.

**मीन :** सर्जनशीलतेला वाव मिळेल. आर्थिक लाभाचे योग आहेत. कुटुंबाकडून पाठिंबा मिळेल.

## शब्दगंध क्र. ७४७९ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | | |
| | ■ | ९ | | ■ | | ■ | |
| ■ | १० | | | ■ | | ■ | |
| ११ | | | ■ | १२ | ■ | १३ | ■ |
| १४ | | | ■ | १५ | | | १६ |
| ■ | | ■ | १७ | | ■ | १८ | |
| १९ | | | | | | | ■ |

**आडवे शब्द :-** १) 'युनियन'चे मराठी रूप ४) आडातून पाणी शेंदून काढण्याचे एक साधन ७) धातूचा दोरा ८) चलाख; हुशार; ताजातवाना ९) जाड दोरी; दोरखंड १०) अखंड; न तुटता ११) तारणारा; वाचविणारा १४) उणीव; कमतरता; वानवा १५) आठवड्यातील सुट्टीचा दिवस १७) बासरा, अलगूज, मुरली १८) चाचणी; परीक्षा; सत्त्व १९) गोष्टीतील गावाचे नाव

**उभे शब्द :-** १) रागाचा आवेश किंवा अतिराग २) निवासस्थान; गेह; गृह ३) नातेवाईक; आप्त; गणगोत ४) अंगाला शेंदूर फासून मरीआईच्या नावाने भिक्षा मागणारा ५) विष्णू ६) एक सुगंधी फूल ९) एक दिवंगत भारतीय क्रिकेटपटू जो पट्टीचा क्षेत्ररक्षक होता (फक्त आडनाव) १०) एकंदरीत; निवड न करता ११) दही घुसळून त्यातून लोणी काढल्यानंतर राहिलेला द्रव १२) उंट हकणारा १३) भास्कर; रवि; सूर्य १६) फळातील किंवा उसातील द्रव १७) बसण्यासाठीचे एक लाकडी साधन; नहर; कालवा

### शब्दगंध क्र. ७४७८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | दा | शि | व | ■ | उ | मे | श |
| र | ■ | वा | रा | ण | शी | ■ | र |
| स | व | ल | त | ■ | र | स | द |
| ■ | ज | य | ■ | बु | ■ | र | ■ |
| सा | न | ■ | मा | र | ■ | स | वा |
| ल | ■ | वि | का | स | ■ | नी | रा |
| दा | गि | ना | ■ | ■ | चो | र | ■ |
| र | ■ | श | त | क | ■ | स | ध्या |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** ज्ञान हे असे धन आहे जे वाटल्याने वाढते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### चुंबक लोखंडालाच का खेचते? प्लास्टिकला का नाही?

एकविसाव्या शतकात विज्ञान आणि खेळ दोन्हीसाठी चुंबक हे मुलांचे आवडते साधन बनले आहे. शाळेत, घरी, खेळण्यांमध्ये आपण चुंबक वापरतो. पण एक गंमत नेहमी लक्षात येते. चुंबकाने लोखंडी खिळे, पिन, क्लिप, सुया एकदम जोरात खेचून घेतल्या जातात. पण त्याच टेबलावर पडलेला रबर, पेन्सिल, प्लास्टिकचा स्केल, काचेचा गोटा, लाकडी वस्तू यांना चुंबक साधा स्पर्शही करत नाही. मग चुंबक असा भेदभाव का करतो? यामागे नक्की काय विज्ञान आहे?सर्वात महत्वाचे कारण म्हणजे पदार्थांच्या अणूंमधील रचना. जगातले सर्व पदार्थ हे अणू आणि रेणूंपासून बनले आहेत.

प्रत्येक अणूच्या आत इलेक्ट्रॉन नावाचे अतिशय लहान कण असतात. हे इलेक्ट्रॉन अणूच्या केंद्राभोवती वीजेच्या वेगाने सतत गोल-गोल फिरत असतात. हे फिरणे म्हणजेच एक प्रकारचा विद्युतप्रवाह आहे. आणि जिथे विद्युतप्रवाह असतो तिथे एक छोटीशी चुंबकीय शक्ती तयार होते. म्हणजे प्रत्येक अणू हा एक छोटा चुंबकच असतो. दुसरे कारण म्हणजे चुंबकीय आणि अचुंबकीय पदार्थांचा फरक. लोखंड, कोबाल्ट आणि निकेल या ३ धातूंना आपण चुंबकीय पदार्थ म्हणतो. या धातूंमध्ये कोट्यावधी अणूंचे जे छोटे-छोटे चुंबक असतात ते नैसर्गिकरित्या एकाच दिशेने रांगेत उभे राहण्याचा गुणधर्म असतो. यालाच डोमेन म्हणतात. जेव्हा बाहेरून एखादा मोठा चुंबक त्यांच्या जवळ आणला जातो, तेव्हा त्या मोठ्या चुंबकाच्या शक्तीमुळे लोखंडातील सर्व लहान चुंबक एकाच दिशेने फिरतात. त्यांची सगळ्यांची शक्ती एकत्र होते आणि एक मोठे चुंबकीय क्षेत्र तयार होते. म्हणूनच लोखंडाचा तुकडा मोठ्या चुंबकाला धावत जाऊन चिकटतो.

स्टीलमध्ये लोखंड असल्याने स्टीलच्या वस्तूही खेचल्या जातात.तिसरे कारण म्हणजे प्लास्टिक, लाकूड, काच, पाणी, ॲल्युमिनियम. हे सर्व अचुंबकीय पदार्थ आहेत. या पदार्थांच्या अणूंमधील इलेक्ट्रॉन देखील फिरतात, पण ते सर्व वेगवेगळ्या दिशेने फिरत असतात. एक वर, एक खाली, एक डावीकडे, एक उजवीकडे. त्यामुळे त्यांची चुंबकीय शक्ती एकमेकांना कापून टाकते. शेवटी एकूण शक्ती शून्य होते. म्हणून बाहेरून कितीही शक्तिशाली चुंबक आणला तरी या पदार्थांना त्याचा काहीही परिणाम होत नाही.

ते चुंबकाला ओळखूच शकत नाहीत.चौथे कारण म्हणजे तात्पुरता आणि कायमचा चुंबक. लोखंडाचा खिळा जर काही वेळ चुंबकाला लावून ठेवला तर तो खिळा देखील थोड्या वेळासाठी चुंबक बनतो. तो जवळच्या पिना उचलू शकतो.

पण चुंबक दूर केला की तो परत सामान्य होतो. याला तात्पुरता चुंबक म्हणतात. पण फ्रिजला लावले चुंबक किंवा कंपासमधील सुई हे कायमस्वरूपी चुंबक असतात. कारण त्यातील अणू एकदा एका दिशेने लागले की ते तसेच राहतात. थोडक्यात, चुंबकाला सर्व वस्तू खेचता येत नाहीत. तो फक्त त्याच वस्तूंना खेचतो ज्यांच्या आतल्या अणूंमध्ये एकजूट असते. लोखंडाच्या अणूंमध्ये ती एकजूट असते म्हणून ते चुंबकाचे मित्र बनतात. प्लास्टिक, लाकूड, काच यांच्या अणूंमध्ये ती नसते म्हणून ते चुंबकासाठी अनोळखी राहतात. म्हणूनच पुढच्या वेळी चुंबकाने खेळताना फक्त लोखंडी वस्तूच उचलल्या जातील हे लक्षात ठेवा. प्लास्टिकच्या खेळण्यांना मात्र चुंबकाची भाषा येत नाही, म्हणून त्या जागेवरच शांत बसून राहतील!

## नदीचा पूल

एका गावात राम आणि शाम नावाचे दोन गट्टी मित्र राहत होते. दोघेही रोज शाळेत एकत्र जायचे. गाव आणि शाळेच्या मधून एक मोठी नदी वाहत होती. त्या नदीवर एक जुना लाकडी पूल होता. एकदा पावसाळ्यात खूप पाऊस पडला. नदीला पूर आला. पूल अर्धा तुटला आणि खूप निसरडा झाला. गावकऱ्यांनी सगळ्यांना त्या पुलावरून जाऊ नका म्हणून सांगितले.

दुसऱ्या दिवशी शाळेची महत्वाची परीक्षा होती. राम म्हणाला, शाम, आपण पुलावरून जाऊ. घाबरू नकोस, मी तुझा हात धरतो. शाम घाबरला होता. तो म्हणाला, नाही राम, शिक्षकांनीच सांगितले आहे धोकादायक आहे. आपण लांबचा रस्ता फिरून जाऊ.

रामाला राग आला. तो म्हणाला, तू भित्रा आहेस आणि एकटाच त्या तुटक्या पुलावरून धावत गेला. अर्ध्या पुलावर गेल्यावर अचानक एक फळी निघाली आणि राम पाय घसरून नदीत पडला. तो पाण्यात बुडू लागला. हे पाहून शामने एक क्षणही वाया घालवला नाही. तो लांबचा रस्ता सोडून धावत गेला, दोर आणि काठी घेऊन आला आणि त्याने रामाला वाचवले.

नंतर राम शामला म्हणाला, माफ कर मित्रा. मी तुला भित्रा म्हटले. पण खरा शहाणा तूच आहेस. रागात घेतलेला निर्णय किती धोकादायक असू शकतो हे आज कळले.

शाम म्हणाला, मित्र तोच जो अडचणीत साथ देतो. आणि शहाणा तोच जो धोका ओळखून योग्य निर्णय घेतो.त्या दिवसापासून दोघेही कुठलाही निर्णय एकत्र आणि विचार करून घेऊ लागले.

बोध : रागात आणि घाईत घेतलेला निर्णय नेहमी चुकीचा असतो. खरा मित्र तोच जो तुम्हाला चुकीच्या वाटेवर जाण्यापासून थांबवतो.

## आत्मशक्ति



याबाबत संत दर्शनसिंहजी महाराजांनी म्हटले आहे.

वही है साज के परदे में, लेहन में, लै में
उसी की जात की परछाईयाँ हर इक शै में न मौज
है न सितारों की आब है कोई
तजल्लियों के उधर आफताब है कोई ।

प्रत्येक सुंदर वस्तूत, प्रत्येक सुरामध्ये आणि प्रत्येक लयबध्द तालांत त्याचे । अस्तित्त्व आहे. त्याच्याविना कोणतीही लाट नाही. कोणताही तारा त्याच्या प्रकाशाशिवाय स्वतःच तळपू शकत नाही. प्रत्येक गोष्टीत त्याचे प्रतिबिंब झळकते.

मौलाना रूमी म्हणतात,

### आत्मिक प्रेम

त्या एका प्रभूची छबी सर्वांमध्ये दिसून येत आहे. तू माणसाचा चेहरा पाहून काय विचार करतो ? बघ तर खरे, तो माणूस नसून त्याच्यामध्ये प्रभुचे व्यक्तित्त्व प्रगट झाले आहे. भगवान श्रीकृष्णांनी म्हटले आहे, जो कोणी सर्वांत मला पाहतो आणि जाणतो की विभिन्न वस्तूंमध्ये कोणताही फरक नाही; असाच माणूस खऱ्या अर्थाने जिज्ञासू आहे, अशा मनुष्याला मी कधीही विसरत नाही.

प्रेमाला अंतरी शोधा !

आत्मा धुंद करणाऱ्या प्रेमाला आम्ही कोठे शोधावे ? ते काही आकाशातील ताऱ्यावर, पर्वत शिखरावर आणि समुद्रात मिळणार नाही. तर ते आपल्या अंतरी लपलेले आहे. संत कबीर म्हणतात,

'कस्तुरी कस्तुरीमृगाच्या बेंबीत असते तरी ते त्यास बाहेर जंगलात शोधत फिरत असते. अशाच तऱ्हेने परमेश्वर हृदयात बसलेला आहे पण माणसाला ते कळत नाही आणि तो त्याला बाहेरच्या जगात शोधत असतो. ' बाह्य जगातील प्रेमात आम्ही परिपूर्णता शोधीत असतो पण हे प्रेम फक्त काही समाधान देऊ शकते. बाहेरच्या प्रेमाबरोबरच आम्ही आत्मिक प्रेमाद्वारे कायमस्वरुपी टिकणारे समाधान, आनंद व सुख प्राप्त करू शकतो. हे प्रेम आमच्या बाह्य प्रेमाला दूर करीत नाही. उलट त्याला अधिकाधीक विकसीत करते. आम्ही आपल्या कुटुंबियांशी (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : पूर्वी तुम्ही म्हणालात त्याप्रमाणे आपण जे अत्तर अंगावर शिंपडतो त्याचाच सुगंध पसरतो.

शिवानीदीदी : एखाद्या व्यक्तीबाबत आपण सतत नकारात्मक विचार निर्माण करत असू तर त्याचा प्रभाव आपल्या ऊर्जाक्षेत्रावर पडतो. अशाने आपली मानसिक स्थिती आणि तब्येतच बिघडणार नाही तर आपली इतर नातीही बिघडतील. ज्यांच्याशी आपलं पटत नाही त्यांचाच आपण जास्त विचार करतो.

सुरेश ओबेरॉय : आपल्याला नकारात्मक विचार करायची सवयही लागेल.

आम्ही सर्वांवर प्रेम करावे असाच खऱ्या प्रेमाचा अर्थ आहे. संत व महात्म्यांनी सांगितले आहे की जर आम्ही परमेश्वरावर खरेखुरे प्रेम करतो तर त्याच्या सर्व मुलाबाळांवर आम्ही प्रेम करावे.येशू ख्रिस्तांनी म्हटले आहे की,

### नकारात्मक विचार

जर कोणी म्हणत असेल की तो परमेश्वरावर प्रेम करतो आणि आपल्या बांधवांशी वैर करत असेल तर तो खोटारडा आहे. आपल्या भावाला तो प्रत्यक्ष पाहतो त्याच्यावर तो प्रेम करीत नाही तर ज्या परमेश्वराला त्याने पाहिलेले नाही त्या परमेश्वरावरही प्रेम करु शकत नाही. (१ यहुन्ना ४:२०)

जेव्हा आम्ही अंतरी परमेश्वराशी जोडले जातो तेव्हा धर्म, राष्ट्र, वर्ण आणि संस्कृति ह्यांच्यात भेदभाव दिसत नाही. आम्हाला सर्वजण प्रभुच्या परिवाराचे सदस्य दिसू लागतात आणि आम्ही आपल्या जागृत आत्म्याचे प्रेम सर्वांना वाटू लागतो. सगळीकडे प्रेम बघा आमच्या आत्म्याला स्वतः सारखेच प्रेम इतर जीवामध्य आढळून येते.

शिवानीदीदी : मनातल्या मनात इतरांवर टीका करण्याची ही सवय आपली ऊर्जा कमी करते. त्यामुळे, आपण जेव्हा इतरांना भेटतो तेव्हा होणारी मतमतांतरं किंवा त्यांचं काही अनपेक्षित वागणं यांसमोर आपण तग धरू शकत नाही. कमकुवत झाल्याने आपली नातीही आपोआपच खूप गुंतागुंतीची होतात. आपण समजा, एखाद्याबरोबर आपले अत्यंत गंभीर वादविवाद झाले आणि ते नातं आपल्याला तोडावं लागलं. याचा अर्थ, आपण दगड उचलला पण तो उचलल्यामुळे हात दुखावला आणि म्हणून आपण तो टाकून दिला. भलेही आपल्या हातावरचं वजन कमी झालं पण हाताला जखम झालीच आहे आणि ती दुखत आहे. त्यामुळे आता आपल्याला त्या हाताने पेन्सिल उचलणंही अवघड झालं आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पोलिस : चोरी कुठे केलीस? चोर : साहेब, बँकेत.
पोलिस : अरे शाब्बास! हिम्मत आहे.
चोर : नाही साहेब, बँकेच्या बाहेर पडलेल्या पिशवीतून.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ 'पाणी' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता?

- आग

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

सर्व भाज्यांमध्ये लाल भोपळा हा आकाराने सर्वात मोठा असतो. लाल भोपळ्याचे वजन सात ते आठ किलोपासून ते ३० ते ३५ किलोपर्यंत असते. साधारणपणे एका वेलीवर ५० ते ६० भोपळे येतात. ही वेल वर्षायु असते. भोपळ्याच्या वजनामुळे ही वेल जमिनीवर पसरते. या वेलीची पाने मोठी असतात, तर याला पिवळ्या रंगाची फुले येतात. याचे दोन प्रकार असतात. एका प्रकारात गोल आकाराचे फळ असते, तर दुसऱ्या प्रकारात लंबगोल आकाराचे फळ असते.

तांबड्या भोपळ्याची बाहेरील साल घट्ट, रंगाने केशरी किंवा काळपट हिरवी असते. तर आतील गर मात्र नारिंगी वा पिवळसर रंगाचा असतो. याच्या मधल्या पोकळीत अनेक पांढऱ्या बिया असतात. साल काढून खाल्ल्यास त्या चवदार लागतात व त्यात बदामासारखेच पौष्टिक गुणधर्म असतात. मराठीत 'तांबडा भोपळा', हिंदीमध्ये 'कद्दू', संस्कृतमध्ये 'तुंबक', इंग्रजीमध्ये 'पमकीन', तर शास्त्रीय भाषेत 'कुकरबिटा' या नावाने प्रसिद्ध असलेला तांबडा भोपळा 'कुकरबिटेसी' कुळातील आहे.

### तांबडा भोपळा

सर्वात सुरुवातीला बाराव्या शतकात तांबडा भोपळा पेरू या देशात निर्माण झाला. आज मात्र संपूर्ण जगामध्ये याचे पीक घेतले जाते. भारत, इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन बेटे, अमेरिका, कॅरेबिया व आफ्रिकेतील काही भाग या सर्व ठिकाणी तांबड्या भोपळ्याचे पीक घेतले जाते. सहसा हे पीक घेण्यासाठी गरम हवामान व दमटपणा आवश्यक असतो, म्हणून ग्रीष्म (उन्हाळा) ऋतूमध्ये याचे पीक घेतले जाते.

औषधी गुणधर्म :


आयुर्वेदानुसार : तांबडा भोपळा हा शीतल, रुचिवर्धक, मूत्रल, दाह व पित्तशामक, बलकारक, शुक्रवर्धक व पौष्टिक असतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांड्ळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वारी पंढरपूरची
## कोळंबा स्वामी

पंढरीचा विठुराया हा केवळ पंढरपुरातच राहतो असे नाही, तर जिथे भक्ताची आर्त हाक असते, तिथे तो धावून जातो. विदर्भाच्या पावन भूमीला अनेक संतांचा वारसा लाभला आहे. या संतांनी विठ्ठल भक्तीची गंगा विदर्भाच्या घराघरात पोहोचवली. अशाच महान संतांपैकी एक अद्वितीय नाव म्हणजे 'संत कोलबास्वामी'!



नागपूरजवळील धापेवाडा या गावाला 'विदर्भाचे पंढरपूर' हे वैभव प्राप्त करून देणारे संत कोलबास्वामी हे वारकरी संप्रदायातील एक देदिप्यमान नक्षत्र आहेत.

संत कोलबास्वामी यांचा जन्म नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यात असलेल्या धापेवाडा या गावी झाला. हा काळ साधारणपणे १७ व्या शतकाच्या उत्तरार्धाचा आणि १८ व्या शतकाच्या सुरुवातीचा मानला जातो. धापेवाडा हे निसर्गरम्य आणि शांत गाव. या गावावरून वाहणारी 'चंद्रभागा' नदी (स्थानिक नदीला कोलबास्वामींच्या भक्तीमुळे पुढे चंद्रभागा नाव मिळाले) या भूमीच्या पवित्रतेची साक्ष देते.

कोलबास्वामींचा जन्म एका सात्विक आणि धार्मिक कुटुंबात झाला. लहानपणापासूनच त्यांच्या अंगी दैवी गुण दिसून येत होते. खेळण्याच्या वयात ते मातीचे विठ्ठल-रुक्मिणी तयार करून त्यांची पूजा करत असत. जगाच्या मोहमायेपासून दूर, विठ्ठल नामाचा गजर करण्यातच त्यांच्या बालमनाला आनंद मिळत असे. मोठी होत असताना त्यांची विठ्ठलाबद्दलची ओढ अधिकच दृढ होत गेली.

कोलबास्वामींनी तरुण वयातच वारकरी संप्रदायाची दीक्षा घेतली. गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर बुक्का आणि हातात टाळ घेऊन त्यांनी विठ्ठल नामाचा गजर सुरू केला. विदर्भातून पंढरपूरचे अंतर खूप जास्त आहे, दळणवळणाची कोणतीही साधने नसताना, घनदाट जंगले आणि नद्या-नाले पार करत कोलबास्वामी दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी एकादशीला पंढरपूरची पायी वारी करत असत.

त्यांची वारी केवळ वैयक्तिक नव्हती. वारीला जाताना आणि येताना ते ठिकठिकाणी कीर्तने आणि भजने करत असत. विदर्भातील जनतेला त्यांनी विठ्ठल भक्तीचा सोपा मार्ग दाखवला. व्यसनमुक्ती, सदाचार आणि प्राणीमात्रांवर दया करण्याचा संदेश त्यांनी आपल्या कीर्तनातून दिला. त्यांच्या सात्विक वाणीमुळे आणि दिव्य व्यक्तित्वामुळे विदर्भातील हजारो लोक त्यांचे शिष्य झाले आणि विदर्भात वारकरी संप्रदायाचा मोठा प्रसार झाला.

वर्षानुवर्षे कोलबास्वामींची पंढरीची पायी वारी अविरत सुरू होती. पाऊस असो की ऊन, पाय थकत नव्हते कारण मनात विठ्ठल भेटीची आस होती. परंतु, काळ बदलला आणि कोलबास्वामी वृद्ध झाले. शरीराने साथ देणे सोडले. पाय थकले, डोळ्यांची दृष्टी अंधुक झाली, पण मनातील विठ्ठलाचा ध्यास मात्र तसाच तरुण होता.

एक वर्ष आषाढी एकादशी जवळ आली. धापेवाड्यातून आणि आजूबाजूच्या गावातून वारकऱ्यांच्या दिंड्या पंढरपूरकडे निघाल्या. टाळ-मृदंगाचा आवाज ऐकून वृद्ध कोलबास्वामींचे मन व्याकुळ झाले. त्यांनाही वारीला जायचे होते, पण शरीराच्या अशक्ततेमुळे त्यांना चालणे अशक्य होते. दिंड्या निघून गेल्या आणि कोलबास्वामी घरीच विठ्ठलाच्या आठवणीत रडू लागले. त्यांनी अन्न-पाणी सोडले.

त्यांनी विठ्ठलाला आर्त हाक मारली: देवा, या शरीराने मला साथ दिली नाही म्हणून तू मला अंतरास का? मी पंढरीला येऊ शकत नाही, म्हणून तू माझ्याकडे येणार नाहीस का? माऊली, तुझ्या दर्शनाशिवाय माझे प्राण कंठाशी आले आहेत!

भक्ताची ही अवस्था पाहून पंढरीचा विठू माऊली जास्त काळ दूर राहू शकला नाही. त्या रात्री पांडुरंगाने कोलबास्वामींना स्वप्नात दृष्टांत दिला. देवाचे ते साजिरे-रूप पाहून स्वामींचे डोळे उघडले. स्वप्नात भगवंत म्हणाले:

कोलबा, तू रडू नकोस. तू माझ्याकडे येऊ शकत नाहीस तर काय झाले, तुझी भक्ती मला तुझ्याकडे ओढून आणत आहे. उद्या सकाळी धापेवाड्याच्या नदीच्या डोहात (पात्रात) जा, तिथे मी तुला मूर्ती रूपात प्रकट होऊन दर्शन देईन. आता तुला पंढरपूरला येण्याची गरज नाही, मी कायमचा तुझ्यापाशी धापेवाड्यात राहीन!

सकाळी उठल्यावर कोलबास्वामींच्या अंगात एक वेगळीच ऊर्जा संचारली. त्यांनी गावातील लोकांना गोळा केले आणि रात्री घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. सुरुवातीला काही लोकांना विश्वास बसला नाही, पण स्वामींच्या चेहऱ्यावरील तेज पाहून सर्वजण त्यांच्यासोबत नदीकाठावर गेले.

कोलबास्वामींनी नदीच्या पात्रात प्रवेश केला. त्यांनी पाण्यात डुबकी मारली आणि काय आश्चर्य! त्यांच्या हाताला एक अतिशय सुंदर, काळ्या पाषाणाची विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती लागली. स्वामींनी ती मूर्ती पाण्याबाहेर काढली. मूर्तीचे दर्शन होताच संपूर्ण धापेवाडा पुंडलिक वरदे हरी विठ्ठल च्या गजरने दुमदुमून गेला.

लोकांनी पाहिले की, ही मूर्ती हुबेहूब पंढरपूरच्या पांडुरंगासारखीच होती. या चमत्कारामुळे लोकांची खात्री पटली की कोलबास्वामी हे सामान्य मनुष्य नसून साक्षात भगवंताचे लाडके संत आहेत. ज्या नदी पात्रात ही मूर्ती सापडली, त्या नदीला पुढे 'चंद्रभागा' म्हणून ओळखले जाऊ लागले.

मूर्ती सापडल्यानंतर संत कोलबास्वामींनी धापेवाडा येथे मंदिराची स्थापना केली. विठ्ठल आणि रुक्मिणी माता यांच्या मूर्तींची शास्त्रोक्त पद्धतीने प्रतिष्ठापना करण्यात आली. हे मंदिर हुबेहूब पंढरपूरच्या मंदिराच्या धर्तीवर चालवले जाऊ लागले.

नदीचा काठ, विस्तीर्ण वाळवंट आणि समोर उभे असलेले सुंदर मंदिर यामुळे धापेवाड्याला 'विदर्भाचे पंढरपूर' हे नाव मिळाले. जे वारकरी गरीब होते, वृद्ध होते किंवा ज्यांना काही कारणास्तव पंढरपूरची वारी करणे शक्य होत नव्हते, ते सर्वजण धापेवाड्याला येऊ लागले. कोलबास्वामींनी विदर्भातील भक्तांना घरबसल्या पंढरीचे सुख मिळवून दिले.

संत कोलबास्वामींच्या चरित्रात अनेक चमत्कारांचे उल्लेख आढळतात, जे त्यांच्या अथांग आत्मिक शक्तीची आणि भगवंताच्या कृपेची साक्ष देतात.

### अन्नपूर्णा माता प्रसन्न (भंडारा चमत्कार)

धापेवाडा मंदिरात दरवर्षी मोठा उत्सव आणि भंडारा (महाप्रसाद) आयोजित केला जात असे. एकदा उत्सवाच्या दिवशी अपेक्षेपेक्षा दसपट जास्त भाविक गोळा झाले. मंदिराच्या स्वयंपाकींनी स्वामींना सांगितले, महाराज, अन्न खूप कमी आहे आणि लोक खूप जास्त आहेत, सर्वांना अन्न कसे पुरणार? कोलबास्वामी हसले. त्यांनी स्वयंपाकघरात जाऊन अन्नाच्या भांड्यांवर तुळशीपत्र ठेवले आणि त्यावर कापड झाकले. त्यांनी सांगितले, आता अन्न वाढायला सुरुवात करा, पण कापड काढू नका. हजारो लोकांनी तृप्त होऊन महाप्रसाद घेतला, तरीही अन्नाचा कणही कमी झाला नाही. भगवंताने आपल्या भक्ताची लाज राखली होती.

### हिंस्र पशूंचे शांत होणे

कोलबास्वामी जेव्हा जंगलाच्या मार्गाने वारीला किंवा एकांतात ध्यानाला जात असत, तेव्हा अनेकदा त्यांचा सामना वाघ, बिबट्या किंवा विषारी सापांशी होत असे. परंतु, स्वामींच्या मनातील करुणा आणि अहिंसेचा प्रभाव असा होता की, हे हिंस्र पशू सुद्धा त्यांच्यासमोर शांतपणे येऊन बसत असत. प्राण्यांनाही स्वामींच्या दिव्य अस्तित्वाची जाणीव होत असे.

पांडुरंगाच्या दारात जशी सर्वांना समान जागा असते, तसेच कोलबास्वामींनी आपल्या दरबारात सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकत्र केले. त्यांनी समाजातील अस्पृश्यता आणि भेदभाव संपवण्यासाठी कीर्तनाचा प्रभावी वापर केला.

देव हा केवळ उपवास किंवा अंधश्रद्धेने मिळत नाही, तर तो अंतःकरणाच्या भावाने मिळतो, हे त्यांनी लोकांना पटवून दिले. तुका म्हणे होय मनाचे कारण या न्यायाने त्यांनी मन शुद्ध ठेवण्यावर भर दिला.

विदर्भातील शेतकरी हा मुख्यत्वे कष्टकरी आहे. कोलबास्वामींनी शेतकऱ्यांना शेती करता करता विठ्ठल नाम घेण्याचा सल्ला दिला, ज्यामुळे कष्टातही आनंद निर्माण झाला.

आपले जीवनकार्य पूर्ण केल्यानंतर, विदर्भाच्या मातीत भक्तीचे रोपटे घट्ट रुजवल्यानंतर, संत कोलबास्वामींनी संजीवन समाधी घेण्याचे ठरवले. धापेवाडा येथील मंदिराच्या परिसरातच त्यांनी विठ्ठल नामाचा जयघोष करत, सर्व भक्तांच्या उपस्थितीत आपली समाधी घेतली.

स्वामी जरी देहरूपाने आपल्यात नसले, तरी त्यांचा आत्मा आणि त्यांची ऊर्जा आजही धापेवाड्याच्या कणाकणात जाणवते. त्यांच्या समाधीच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविक नतमस्तक होतात.

आजच्या काळातही धापेवाडा येथील विठ्ठल मंदिराचे महत्त्व तसूभरही कमी झालेले नाही. दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी एकादशीला येथे अभूतपूर्व गर्दी होते. विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून शेकडो दिंड्या पायदळ चालत धापेवाड्याला येतात. चंद्रभागेच्या पात्रात स्नान करून भाविक जेव्हा विठुरायाचे आणि संत कोलबास्वामींच्या समाधीचे दर्शन घेतात, तेव्हा त्यांचे जीवन धन्य होते.

नागपूर आणि विदर्भाच्या आध्यात्मिक नकाशावर धापेवाडा हे अग्र क्रमांकाचे तीर्थक्षेत्र आहे आणि याचे संपूर्ण श्रेय संत कोलबास्वामी यांच्या भक्तीला जाते.



रमेश देशपांडे
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## विवेकाच्या प्रकाशाकडे ने

"मुसाफिर"
संकलन: दिशान फिचर्स




तमसो मा ज्योतिर्गमय। याचा अर्थ, अंधारातून प्रकाशाकडे ने. कुणी म्हणेल. अंधारातून प्रकाशाकडे जायलाही प्रार्थना कशाला करायला हवी? कंदील हवा. कंदिलाचा प्रकाश अंधारातून जायला पुरेसा आहे. पण नाही. ज्याला दृष्टी नाही, त्याला कंदिलाच्या प्रकाशाचा उपयोग नाही. आंधळ्याच्या हाती कंदील असला तर त्याच्या प्रकाशात डोळस सोबती मुक्कामाला पोचतील. हा कंदीलधारी अनोळखी प्रदेशात भरकटत राहील. काट्या गोट्यांतून रक्तबंबाळदेखील होईल.

प्रार्थनेतला हा अंधार स्वार्थाचा आहे. अहंकाराचा आहे. अहंकाराचा अंधार बाहेर नसतो, अंत:करणात वसतो. हा अहंकाराचा, स्वार्थाचा अंधार अंतःकरणात दाटला, की मग वासनांची घुबडे धुत्कार करू लागतात. त्या अशुभ एकसुरी आवाजाने माणूस भयकंपित होतो. त्या तमामुळे एक तामसी प्रवृत्ती अंत:करणात उसळते. माणसाला विवंचनेत, अविवेकी वर्तनाच्या गर्तेत लोटते. त्यातून बाहेर पडायला हवा असतो प्रकाश. त्या प्रकाशाकडे ने, असे ही प्रार्थना म्हणते. म्हणूनच याज्ञवल्क्यांनी शिष्याला अहंकारापासून सावध राहायला सागितले. शिष्य म्हणाला, मला हे ठाऊक आहे. आपण असे सांगून मला हिणवता. याज्ञवल्क्य नुसते हसले.

दुसऱ्या दिवशी तो शिष्य समिधा आणायला निघाला. दुसरा शिष्य सोबतीला होता. गुरू मागून येत होतेच. चालता चालता रस्त्यावर घसरण लागली. चिखलामुळे पाय निसटू लागले. एक शिष्य दुसऱ्याला म्हणाला, अरे माझा हात धर ना. दुसरा शिष्य म्हणाला, मी का तुझा हात धरू? निसरड्या जागेवरून तुझाही पाय घसरण्याची तेवढीच शक्यता आहे. तू माझा हात धर.

दोघेही आपापल्या हातावर अडून होते. मी तुझा हात धरणार नाही. तू माझा हात धर, असे भांडत राहिले आणि शेवटी त्या नसत्या अहंकारी वृत्तीमुळे दोघेही पाय घसरून चिखलात पडले. मागून याज्ञवल्क्य आले. अहंकाराची घसरण अशीच भोवते. विवेक संपतो.

अरे, एकदा हातात हात घातल्यावर कुणी कुणाचा हात धरलाय, हे कळते का? परस्परांचा तोल सावरणे मोलाचे, पण अहंकारापायी ते जमले नाही.

शिष्य म्हणाला, आता मी सावध झालो. तो याज्ञवलक्यांना शरण गेला. तुकाराम महाराज म्हणूनच हा अहंकाराचा ताठा नको, असे म्हणतात. नको मज ताठा, नको अभिमान । तुजवाचूनी शीण, होतो जीवा ।।

– किशोर गांधी

## भिंगारमध्ये २३ जुलैला 'स्वर पंढरी' मैफली

नगर – आषाढी एकादशीनिमित्त ओंकार आदिनाद कला प्रतिष्ठान आयोजित आणि ओंकार संगीत निकेतन प्रस्तुत स्वर पंढरी या भक्तिसंगीत मैफलीचे आयोजन २३ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता विद्यालयाच्या मालती हॉल येथे करण्यात आले आहे.

या मैफलीत ओंकार संगीत निकेतनच्या भिंगार आणि दरेवाडी शाखेतील विद्यार्थ्यांचे भक्तिगायन सादर होणार आहे. विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या संचालिका संगीता देऊळगावकर आणि ओंकार देऊळगावकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. कार्यक्रमात ओंकार देऊळगावकर हे संवादिनीची साथ करणार असून अनुज दरवडे तबल्याची साथ करणार आहेत.

## चाँद शेख यांना राजर्षी शाहू महाराज राज्यस्तरीय क्रीडा रत्न पुरस्कार जाहीर



नगर – शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना नगर तालुका तालिम सेवा संघाच्या वतीने राजर्षी शाहू महाराज राज्यस्तरीय क्रीडा रत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

हा पुरस्कार २५ जुलै रोजी निमगाव वाघा (ता. नगर) येथे आयोजित 'जगतगुरु संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन' सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांनी शिक्षक म्हणून कार्यरत असताना अनेक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन त्यांना उज्ज्वल भविष्याची दिशा दिली आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध शैक्षणिक उपक्रम राबविले. ते स्वत: एक उत्कृष्ट कुस्तीपटू होते, त्यांनी अनेक खेळाडू देखील घडविले आहे. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र असावे, या विचारातून त्यांनी सातत्याने काम केले आहे.



सावेडी येथील झोपडपट्टी परिसरातील गरजू बालकांना 'स्नेहबंध' तर्फे शर्ट चे वाटप करतांना संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, इंजि. अभिजीत ढाकणे, मिलिंद कानडे आयुष लालबोन्द्रे.

## सावेडीतील झोपडपट्टीतील चिमुकल्यांना लाभला 'स्नेहबंध'

नगर – सामाजिक बांधिलकीची जाणीव जपत आणि वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने, स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने सावेडी परिसरातील झोपडपट्टीतील गरीब व गरजू मुलांसाठी शर्ट वाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

याप्रसंगी इंजिनियर अभिजीत ढाकणे, मिलिंद कानडे, आयुष लालबोन्द्रे, स्वयंम बारस्कर आणि प्रथमेश राठोड आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते परिसरातील लहान मुलांना नव्या शर्टचे वितरण करण्यात आले. नवीन शर्ट हाती पडताच चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि हसू उमटल्याचे पाहायला मिळाले.

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, समाजातील प्रत्येक मुलाला सन्मानाने जगण्याचा आणि शिक्षण घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. केवळ भौतिक मदत करणे हा यामागचा उद्देश नसून, गरजू मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे आणि त्यांच्या मनात 'आपणही समाजाचे भाग आहोत' हा आत्मविश्वास निर्माण करणे ही काळाची गरज आहे. समाजाने अशा वंचित मुलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. प्रत्येकाने आपल्या परीने सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून खारीचा वाटा उचलला, तर आपला समाज अधिक संवेदनशील आणि सक्षम बनेल.

## श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक शाळेत आनंददायी-दप्तरमुक्त शनिवार उपक्रम

नगर – शहरातील सांगळे गल्ली येथील श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक शाळेत आनंददायी शनिवार – दप्तरमुक्त शनिवार हा उपक्रम सुरु करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच संस्कार, व्यक्तिमत्त्व विकास, सकारात्मक विचार आणि यशाचा मंत्र याबाबत धडे देण्यात आले.

आनंददायी शनिवार – दप्तरमुक्त शनिवार या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांच्या चौकटीबाहेर जाऊन प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी मिळाली. जीवनात यश मिळविण्यासाठी सकारात्मक विचार, मेहनत, सातत्य, चांगले संस्कार आणि आई-वडिलांचा सन्मान या मूल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर प्रभावीपणे बिंबविणारा हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.



समर्थ विद्यामंदिर प्राथमिक शाळेत आनंददायी-दप्तरमुक्त शनिवार उपक्रमात बोलताना प्रियंका चिखले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व शालेय समितीचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सामान्य कुटुंबातील मुलांनीही जागतिक स्तरावर यश मिळविल्याची अनेक उदाहरणे सांगितली. त्यांनी एका सामान्य घरातील विद्यार्थ्याने तयार केलेल्या अत्याधुनिक रोबोटचा उल्लेख करून, मोठी स्वप्ने पाहण्यासाठी आर्थिक परिस्थिती अडथळा ठरत नाही, तर जिद्द, चिकाटी आणि मेहनत यांची आवश्यकता असते, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम याकडेही लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्या प्रियांका चिखले यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारत आपल्या बालपणापासून पत्रकारिता, शिक्षण, नाटक आणि चित्रपट क्षेत्रातील प्रवास उलगडून सांगितला. जीवनात आलेले संघर्ष, त्यावर मात करण्यासाठी घेतलेले परिश्रम आणि सातत्य यामुळेच यश मिळाले, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्याचा सल्ला दिला.

स्वतःची स्वप्ने स्वतःच पूर्ण करा. प्रत्येक स्पर्धेत भाग घ्या, कारण प्रत्येक स्पर्धा आपल्याला नवीन अनुभव देते. आई-वडिलांचे कष्ट नेहमी लक्षात ठेवा आणि त्यांचा सन्मान करा. आजूबाजूच्या वाईट गोष्टींकडे लक्ष न देता चांगल्या गोष्टींचा स्वीकार करा. जीवनात कोणताही शॉर्टकट वापरू नका. व्यसनांच्या आहारी जाऊ नका. आरोग्याची काळजी घ्या. आईच्या हातच्या जेवणाची चव बाहेरच्या कोणत्याही पदार्थाला येत नाही, त्यामुळे घरातील संस्कार आणि कुटुंबाचे महत्त्व जपा, असे आवाहन त्यांनी केले.

शाळेचे मुख्याध्यापक अजय महाजन यांनी शाळेत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन स्वतःच्या सुप्त गुणांना वाव द्यावा, आत्मविश्वास वाढवावा आणि सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

सूत्रसंचालन लीना बंगाळ यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय वैशाली मगर यांनी करून दिला. आभार सतीश मेढे यांनी मानले.

## खगोलशास्त्रासह साहित्यातही डॉ. जयंत नारळीकर यांचे कार्य प्रेरणादायी

### साहित्यिक डॉ. नितीन हांडे यांचे मत; केडगावमध्ये रंगली वैज्ञानिक दृष्टिकोनावरील चर्चा

नगर – खगोलशास्त्रज्ञ आणि साहित्यिक म्हणून डॉ. जयंत नारळीकर यांचे कार्य मोठे आहे. मानवी इतिहासातील आणि एकूण सामाजिक उन्नतीमधील वैज्ञानिक दृष्टिकोन किती महत्त्वाचा आहे यावर त्यांनी सोप्या भाषेत लेखन केले. त्यांचे संशोधन आणि लेखन एकूणच समाजासाठी दिशादर्शक आणि प्रेरणादायी असल्याचे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नितीन हांडे यांनी व्यक्त केले.



केडगावमध्ये डॉ. जयंत नारळीकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करताना डॉ. नितीन हांडे व मान्यवर.

ज्ञानकौशल्य ट्रस्टतर्फे १९ जुलै रोजी डॉ. जयंत नारळीकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन केले होते. केडगाव येथील अपेक्स मॉडेल इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित कार्यक्रमात डॉ. नितीन हांडे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यक शिवाजीराव लंके होते. यावेळी साहित्यिक प्रा. डॉ. सुधाकर शेलार, प्रा. डॉ. महेबुब सय्यद, अ‍ॅड. राहुल ठाणगे, आत्मनिर्धार फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी, ट्रस्टच्या सचिव माधुरी चोभे, अध्यक्ष व साहित्यिक सचिन मोहन चोभे, कर्मलक्ष्मी महिला मंडळाच्या अध्यक्षा मार्या थोरात आदी उपस्थित होते. व्याख्यानासह यावेळी प्रश्नोत्तराच्या दरम्यान वैज्ञानिक दृष्टिकोन आणि त्याची सामाजिक उन्नतीसाठी गरज यावर सविस्तर चर्चा झाली.

डॉ. नितीन हांडे म्हणाले की, जयंत नारळीकरांनी मराठी साहित्यातून आणि आपल्या व्याख्यानासह जीवनातून वैज्ञानिक दृष्टिकोन दिला. कोणी सांगतो म्हणून आंधळा विश्वास न ठेवता प्रत्येक गोष्टींची चिकित्सा करणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन हे त्यांनी सोप्या भाषेत समजावून सांगितले. त्यांनी कथा व कादंबरीद्वारे माणसांमधील कुतूहल जीवंत ठेवण्यासाठी प्रयत्न केले. माणूस शिकला म्हणजे त्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झाला असे नव्हे. अनेक शिकलेले लोक एव्हाना शास्त्रज्ञ आणि डॉक्टरसुद्धा अंधश्रद्धापूरक वागत आहेत. त्याचवेळी संत गाडगेबाबा आणि संत बहिणाबाई यांच्याकडे वैज्ञानिक दृष्टिकोन होता. एकूण संतसाहित्य आणि वारकरी संप्रदायातील वैचारिक मांडणीत असाच विचार दिसतो.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक शिवाजीराव लंके यांनीही सजग आणि जागरूक समाजाच्या निर्मितीसाठी कृतिशील प्रयत्नांची गरज असल्याचे म्हटले. ते म्हणाले की, प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून आणि विद्यार्थ्यांना समजणाऱ्या भाषेत असावे. तसेच त्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सजग व कृतिशील नागरिक घडवण्यासाठीचे प्रयत्न असावेत.

डॉ. नारळीकर यांनी आपल्या संशोधनातून सुप्रसिद्ध संशोधक आईनस्टाईन यांच्या अनेक थिअरीज तपासून पाहिल्या. हॉइल-नारळीकर थिअरी ही खगोलशास्त्र विषयातील एक महत्त्वाचे संशोधन म्हणून नोंद झालेली आहे. आपण सर्वांनी त्यांचे विचार पुढे नेण्यासाठी कार्यरत राहण्याची आवश्यकता आहे. त्यातूनच विचारी समाजाची निर्मिती होईल.



इनरव्हील क्लब ऑफ अहिल्यानगर व्हीनसच्या नूतन पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारला.

## इनरव्हील क्लब ऑफ अहिल्यानगर व्हीनसच्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहात

नगर – इनरव्हील क्लब ऑफ अहिल्यानगर व्हीनसच्या २०२६-२७ या वर्षासाठीच्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विविध मान्यवर, क्लबच्या सदस्य आणि निमंत्रितांच्या उपस्थितीत नव्या पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारत आगामी वर्षातील समाजोपयोगी उपक्रमांचा संकल्प केला.

समारंभात मेघा बकरे यांनी अध्यक्षा, सारिका मुथा यांनी सचिव, प्रगती गांधी यांनी उपाध्यक्षा, सीमा गांधी यांनी खजिनदार, स्वाती गांधी यांनी संपादिका (एडिटर) तर कोमल वाधवा यांनी आय.एस.ओ. म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी निवृत्त अध्यक्षा अर्पिता शिंगवी यांनी मागील वर्षभरात क्लबतर्फे राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रमांचा आढावा घेत नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या.

नवनिर्वाचित अध्यक्षा मेघा बकरे यांनी आपल्या मनोगतात महिला सक्षमीकरण, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संवर्धन, सामाजिक जनजागृती आणि विविध सेवाभावी उपक्रमांना प्राधान्य देत वर्षभर समाजहिताचे प्रकल्प राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत सेवा कार्य पोहोचविण्यासाठी क्लब कटिबद्ध राहील, असेही त्यांनी सांगितले.

या प्रसंगी क्लबच्या सदस्य कल्पना गांधी, आरती थोरात, श्रीलता अडेप, भाविका चंदे, शीतल मेटकर, प्रियांका होले, सपना भळगट, वैशाली गुगळे, दीपा राच आणि शीतल होनराव यांच्यासह सदस्य व मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी नव्या कार्यकारिणीचे अभिनंदन करून त्यांच्या नेतृत्वाखाली इनरव्हील क्लब ऑफ अहिल्यानगर व्हीनस सामाजिक बांधिलकी जपत समाजहिताचे विविध उपक्रम प्रभावीपणे राबवेल, असा विश्वास व्यक्त केला.



नगर सोलापूर महामार्गावरील रुईछत्तीशी परिसरात आयोजित करण्यात आलेल्या मोफत दंत व मूळव्याध तपासणी शिबिरात वारकऱ्यांची तपासणी करताना दंततज्ज्ञ डॉ. विवेकानंद चेडे, डॉ. पल्लवी चेडे, मूळव्याध तज्ज्ञ डॉ.संजय शिंदे आदी.

# वारकऱ्यांसाठी मोफत दंत व मूळव्याध तपासणी शिबीर

**चेडे डेंटल क्लिनिक व साईलीला हॉस्पिटलचा सेवाभावी उपक्रम**

नगर – आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत नगर तालुक्यातील रुईछत्तीशी परिसरात मोफत दंत व मूळव्याध तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. केडगाव येथील चेडे डेंटल क्लिनिक व साईलीला हॉस्पिटल यांच्या वतीने आयोजित या शिबिरात शेकडो वारकरी तसेच ग्रामस्थांनी मोफत आरोग्यसेवेचा लाभ घेतला.

शिबिरात दंततज्ज्ञ डॉ. विवेकानंद चेडे व डॉ. पल्लवी चेडे यांनी वारकरी व रुग्णांची दंत तपासणी करून दातदुखी, हिरड्यांचे विकार, तोंडातील संसर्ग आदी समस्यांवर प्राथमिक उपचार केले. गरजेनुसार औषधोपचाराचा सल्ला देण्यात आला तसेच तोंडाची स्वच्छता, दातांची नियमित निगा आणि तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

याच शिबिरात मूळव्याध तज्ज्ञ डॉ. संजय शिंदे यांनी मूळव्याध व इतर संबंधित रुग्णांची तपासणी करून योग्य उपचार व पुढील वैद्यकीय सल्ला दिला. तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व मार्गदर्शन मिळाल्याने वारकरी आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

आषाढी वारीदरम्यान प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांना वेळेवर आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने चेडे डेंटल क्लिनिकच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रुग्णांकडून कोणतेही शुल्क न आकारता दंत तपासणी, प्राथमिक उपचार करण्यात आले.

या समाजोपयोगी उपक्रमाबद्दल वारकरी व ग्रामस्थांनी आयोजक तसेच सहभागी डॉक्टरांचे आभार मानले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी चेडे डेंटल क्लिनिकचे आरोग्य कर्मचारी, स्वयंसेवक आणि आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले.

सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेला हा उपक्रम आरोग्यसेवा आणि समाजसेवेचा सुंदर संगम ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# 'समर्पण चातुर्मास २०२६'ची नांदी; सारसनगरात प्रविणऋषीजींचे आगमन



नगर – परमपूज्य उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज साहेब तसेच मधुरकंठी पूज्य तीर्थेशऋषीजी महाराज साहेब यांच्या पावन सान्निध्यात होणाऱ्या 'समर्पण चातुर्मास २०२६'च्या निमित्ताने धर्मयात्रेदरम्यान १९ जुलै रोजी सारसनगर येथे त्यांच्या मंगलमय आगमनाचे अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि जल्लोषपूर्ण स्वागत करण्यात आले. संपूर्ण परिसरात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे अद्वितीय वातावरण अनुभवायला मिळाले.

या स्वागत सोहळ्यानिमित्त महात्मा फुले चौकापासून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. महिलांचे आकर्षक कलश पथक, चौदा स्वप्न मंडळ, अष्टमंगल मंडळ, अर्हम विज्ञा मंडळ, आगम मंडळ, पाठशाळेतील बालक–बालिका, भक्तामर मंडळ, युवक मंडळ तसेच हजारो श्रावक–श्राविका यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शोभायात्रा भक्तिमय वातावरणात पार पडली. मार्गावर उभारण्यात आलेल्या स्वागत कमानी, रंगीबेरंगी रांगोळ्या, भजन संगीतची धून आणि जयघोषांच्या गजरात गुरुदेवांचे स्वागत करण्यात आले.

हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या भाविकांचा उत्साह पाहून पूज्य गुरुदेवांनी सारसनगरवासीयांचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यांनी आगामी 'समर्पण चातुर्मास २०२६' मध्ये प्रत्येकाने तन, मन आणि भावनेने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. आपल्या प्रेरणादायी प्रवचनात त्यांनी कंकर कभी सफल नहीं होता और बीज कभी निष्फल नहीं होता या प्रभावी उक्तीच्या माध्यमातून प्रत्येकाने जीवनात बीजाप्रमाणे स्वतःला समाजासाठी समर्पित करून यशस्वी आणि अर्थपूर्ण जीवन जगावे, असा संदेश दिला.

दिवसभराच्या व्यस्त कार्यक्रमादरम्यान पूज्य महाराज साहेबांनी बालक, युवक, सुव्रती, महिला तसेच श्रावक–श्राविका यांच्याशी सविस्तर धर्मचर्चा केली. समाजासमोरील विविध आव्हाने, बदलती जीवनशैली, संस्कारांचे महत्त्व आणि धर्माधिष्ठित जीवन याविषयी त्यांनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.

समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबुशेठ) बोरा यांनी आपल्या मनोगतात सारसनगरवासीयांच्या एकजुटीचे विशेष कौतुक करत सांगितले की, सारसनगर हा अहिल्यानगरातील जैन समाजाचा खऱ्या अर्थाने गड आहे. आज केवळ स्वागत सोहळा झाला नाही, तर संपूर्ण परिसराने आपल्या श्रद्धा, संस्कार आणि संघटित शक्तीचे दर्शन घडवले आहे. पाच वर्षांच्या चिमुकल्यांपासून ते किशोरवयीन मुले–मुली, युवक, युवती, माता–भगिनी आणि ज्येष्ठ नागरिक अशा प्रत्येक घटकाने एकत्र येऊन गुरुदेवांचे जे भव्य स्वागत केले, ते संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. आजची ही उपस्थिती आणि प्रत्येकाच्या डोळ्यांतील समर्पणाची भावना मला विश्वास देते की, सारसनगर परिसर आगामी 'समर्पण चातुर्मास २०२६'ला इतिहासातील सर्वात भव्य, दिव्य आणि अभूतपूर्व यश मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावेल.

यावेळी उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण करत त्यांनी सर्वांना जोशपूर्ण घोषणा देण्याचे आवाहन केले. हजारो भाविकांनी एकमुखाने घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला – चातुर्मास किसका? चातुर्मास हमारा!!

संघाचे सेक्रेटरी दिलीप मेहेर यांनी आपल्या प्रास्ताविकातून गुरुदेवांच्या आगमनाविषयीची आतुरता आणि आगमनाने लाभलेल्या आध्यात्मिक आनंदाच्या भावना व्यक्त केल्या. संघाचे अध्यक्ष कांतीलाल गांधी यांनीही मनोगत व्यक्त करत सर्वांचे स्वागत केले. सागर गुंदेचा यांनी प्रभावी सूत्रसंचालन करून तर प्रवीण शिंगवी यांनी त्यांच्या गुरुदेवांना समर्पित गीताने कार्यक्रमात रंगत आणली, तर युवक मंडळाच्या वतीने किरण भंडारी यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विश्वस्त मंडळ, युवक मंडळ, महिला मंडळ तसेच सर्व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर मिलापचंद, अमित व रुपेश पटवा (महावीर केटरर्स) यांच्या वतीने नवकारशी (नाश्ता)ची उत्तम व्यवस्था करण्यात आली.

या प्रसंगी समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबुशेठ) बोरा व समितीचे पदाधिकारी, प्रभागातील नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, श्रावक संघाचे उपाध्यक्ष पोपटलाल भंडारी, विश्वस्त मंडळ, युवक मंडळ, महिला मंडळ तसेच मोठ्या संख्येने श्रावक–श्राविका उपस्थित होते.सारसनगरातील या भव्य स्वागत सोहळ्याने आगामी 'समर्पण चातुर्मास २०२६'च्या ऐतिहासिक आणि अभूतपूर्व यशाची जणू मंगल नांदीच ठरली.

# मोबाईल न वापरण्याचा भिंगारच्या नवीन मराठी शाळेतील चिमुकल्यांचा प्रेरणादायी संकल्प

नगर – मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे मुलांच्या आरोग्यावर, अभ्यासावर आणि मानसिक विकासावर होत असलेल्या दुष्परिणामांची जाणीव करून देण्यासाठी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळा, भिंगार येथे 'मोबाईलचे दुष्परिणाम' या विषयावर प्रबोधनात्मक उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचा प्रभाव इतका झाला की पूर्वप्राथमिक ते इयत्ता चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आम्ही मोबाईल वापरणार नाही असा संकल्प केला.




अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळेत मोबाईल वापराचे दुष्परिणाम या विषयावर नाटिका सादर करताना शिक्षिका.

पूर्वप्राथमिक विभागाच्या शिक्षिकांनी मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारा चिडचिडेपणा, अभ्यासाकडे होणारे दुर्लक्ष, वेळेचा अपव्यय, मैदानी खेळांपासून वाढणारे अंतर तसेच डोळे व आरोग्यावर होणारे दुष्परिणाम यावर आधारित प्रभावी नाटिका सादर केली. सोप्या भाषेतील संवाद आणि वास्तववादी प्रसंगांमुळे विद्यार्थ्यांवर या नाटिकेचा सकारात्मक परिणाम झाला.

नाटिका संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने मोबाईलचा अनावश्यक वापर टाळण्याची, अभ्यास, वाचन, मैदानी खेळ आणि सर्जनशील उपक्रमांना अधिक वेळ देण्याची शपथ घेतली. या वेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे भाव आणि दृढनिश्चय उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता.

शाळेच्या या उपक्रमाचे पालक आणि शिक्षणप्रेमींनीही कौतुक केले. डिजिटल युगात मोबाईलचा योग्य आणि मर्यादित वापर करण्याची सवय लहानपणापासूनच लागावी, या उद्देशाने राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरला असून, इतर शाळांसाठीही अनुकरणीय उपक्रम म्हणून पाहिला जात आहे. या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापिका उज्वला कळमकर बालवाडी इन्चार्ज अर्चना गायकवाड यांनी कौतुक केले. या नाटिकेत कल्याणी धाडगे, शोभा गायके, सुजाता अंगरके वैशाली विधाते यांनी सहभाग घेतला होता.

संस्थेच्या प्रमुख कार्यवाहक छायाताई फिरोदिया याच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकास व मूल्य शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे जाते. मोबाईलपेक्षा पुस्तक, खेळ आणि संस्कार महत्त्वाचे असल्याने सातत्याने असे उपक्रम शाळेत राबविले जातात. असे मुख्याध्यापिका उज्वला कळमकर यांनी सांगितले.

# सुनीता दुधाट यांना मराठी साहित्य विषयात विद्यावाचस्पती पदवी प्राप्त



नगर – नगरमधील रहिवासी असणाऱ्या मराठी साहित्याच्याअभ्यासक सौ. सुनीता दुधाट (वय ५८, घुमरेगल्ली) यांना सावित्रीबाई फुले विद्यापीठातून मराठी साहित्य विषयात 'विद्यावाचस्पती' (पीएचडी) पदवी प्रदान करण्यात आली. सुनीता दुधाट यांनी नगरमधील सारडा कॉलेजमधून त्यांचे संशोधन पूर्ण केले.

मराठी साहित्यामध्ये त्यांनी 'निवडक मराठी लेखिकांच्या ललित गद्याचा आदिबंधात्मक अभ्यास' या प्रबंध विषयावर संशोधन केले आहे. यामध्ये त्यांनी इरावती कर्वे, दुर्गा भागवत आणि अरुणा ढेरे या लेखिकांच्या लेखनावर विशेष संशोधन केले आहे. या संशोधनासाठी त्यांना सारडा कॉलेजच्या प्राचार्या व प्रबंध मार्गदर्शक डॉ. माहेश्वरी गावित, नगरमधील ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, लेखिका अरुणा ढेरे या सर्वांचे मार्गदर्शन लाभले आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठात झालेल्या अंतिम चर्चा परीक्षेमध्ये बहिस्थ परीक्षक म्हणून डॉ. वले तर अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. तुकाराम रोंगटे उपस्थित होते.

मराठी साहित्यातील दुर्मिळ आणि अस्पर्शित विषयावर सुनीता दुधाट यांनी उल्लेखनीय संशोधन त्यांच्या प्रबंधातून मांडले असल्याचे मत विषयतज्ज्ञांनी परीक्षेनंतर व्यक्त केले. निवृत्तीनजीकच्या वयात सुनीता दुधाट यांनी ८६० पानांच्या दीर्घ प्रबंधावर विद्यावाचस्पती पदवी प्राप्त केल्याने कुटुंबीय व मित्रपरिवाराकडून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# रंगोत्सव २०२६ अंतर्गत २६ जुलै रोजी राज्यस्तरीय खुली सोलो स्वगत स्पर्धा

नगर – हौशी प्रायोगिक कलावंत संघ, अहिल्यानगर शाखेच्या वतीने 'रंगोत्सव २०२६' अंतर्गत राज्यस्तरीय खुली सोलो स्वगत स्पर्धा २६ जुलै रोजी आयएमएससीडीआर ऑडिटोरियम, पहिला मजला, नगर कॉलेजसमोर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली आहे.

राज्यभरातील हौशी कलाकार, रंगकर्मी आणि नाट्यप्रेमींना आपल्या अभिनय कौशल्याचे सादरीकरण करण्यासाठी ही स्पर्धा एक प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. स्पर्धेची प्रवेश फी १०० रुपये असून, विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिके, सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.

कार्यक्रमास हौशी प्रायोगिक कलावंत संघाच्या मध्यवर्ती शाखेचे प्रमुख कार्यवाह अजय धवणे (चंद्रपूर) आणि सुरेश गांगुर्डे (मुंबई) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेतील प्रथम क्रमांकास ३,००० रुपये, द्वितीय क्रमांकास २,००० रुपये, तृतीय क्रमांकास १,००० रुपये, तसेच दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी ५०० रुपये अशी रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक केक फाउंडेशन यांच्या सौजन्याने, द्वितीय पारितोषिक स्व. रंगकर्मी श्रीराम कुलकर्णी स्मरणार्थ, तर तृतीय पारितोषिक स्व. रंगकर्मी अनिलकुमार खळेकर स्मरणार्थ प्रदान करण्यात येणार आहे. या स्पर्धेस श्रेणिक शिंगवी, केक फाउंडेशन, नटेश्वर कला क्रीडा मंडळ, राहुरी, साईरथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स तसेच वेव्हलनेस एंटरप्रायझेस यांचे प्रायोजकत्व लाभले आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कलाकारांनी अधिक माहितीसाठी नानाभाऊ मोरे (मो. ९६०४९०१७९५) किंवा मोनेश ढाळे (मो. ९९७०३५५१३४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन हौशी प्रायोगिक कलावंत संघ, अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष संजय लोळगे यांनी केले आहे.

# गुरुकुल कॅम्पस मध्ये कब बुलबुल युनिटचे उद्घाटन

नगर – तपोवनरोड येथील गुरुकुल कॅम्पस मध्ये डॉ. पी.ए. इनामदार प्राथमिक विद्यालय व गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये कब बुलबुल युनिटचे उद्घाटन पंडित नेहरू हिंदी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबासाहेब बोडखे यांच्या हस्ते तर तौसीफ शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.



तपोवनरोड येथील गुरुकुल कॅम्पस मध्ये डॉ. पी.ए. इनामदार प्राथमिक विद्यालय व गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये कब बुलबुल युनिटचे उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर.


उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्यातील नेतृत्वगुण फुलवण्यासाठी शालेय स्तरावर कब–बुलबुल या उपक्रमाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे मत व्यक्त केले.

कार्यकमात लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेस हार घालून विद्यार्थ्यांना कब बुलबुल ची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष एन.ए.पठाण शाला समिती चेअरमन अनिल साळुंके, सचिव समीर पठाण, शाला समितीचे देविदास डहाळे, लक्ष्मीकांत गरड, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड, गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्राचार्या दीप्ती कराळे, महाराष्ट्र ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य शुभम टेमकर, आदी उपस्थित होते. प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड, सूत्रसंचालन बुलबुल लीडर शेख सबा यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कब मास्टर अमोल निमसे व बुलबुल लीडर शेख सबा यांनी परिश्रम घेतले.

# कुतुबमिनारवर झळकले हिवरे बाजारचे विकास मॉडेल

**कुतुबमिनारवर झळकले हिवरे बाजारचे विकास मॉडेल; पद्मश्री पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाला राष्ट्रीय स्तरावर आणखी एक मानाचा मुजरा**

नगर – पद्मश्री पोपटराव पवार यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आणि हिवरे बाजार ग्रामस्थांच्या एकजुटीच्या बळावर उभ्या राहिलेल्या आदर्श ग्रामविकास मॉडेलची दखल आता देशाच्या राजधानीतही घेण्यात आली आहे. दिल्लीतील ऐतिहासिक कुतुबमिनार येथे सादर करण्यात येणाऱ्या अत्याधुनिक लेझर शोमध्ये भारतातील समाजात सकारात्मक परिवर्तन घडविणाऱ्या 'चेंज मेकर्स' तसेच प्रेरणादायी व्यक्ती, संस्था आणि गावांच्या कार्याची माहिती पर्यटकांना दाखविली जाते. या प्रतिष्ठित चित्रफितीत अहिल्यानगर जिल्ह्यातील हिवरे बाजार गावाचा समावेश करण्यात आला असून, ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे.



देश–विदेशातून दररोज हजारो पर्यटक कुतुबमिनारला भेट देतात. या पर्यटकांना भारतातील प्रेरणादायी विकासकथा आणि सामाजिक परिवर्तनाची उदाहरणे लेझर शोच्या माध्यमातून अनुभवता येतात. त्यामध्ये हिवरे बाजारने जलसंधारण, पाणी व्यवस्थापन, लोकसहभाग आणि शाश्वत ग्रामविकासाच्या माध्यमातून घडवून आणलेला परिवर्तनाचा प्रवास प्रभावीपणे सादर करण्यात आला आहे.

चित्रफितीत पद्मश्री पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या जलसंधारणाच्या विविध उपक्रमांची, पावसाच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन, भूजल पुनर्भरण, वृक्षसंवर्धन, दुष्काळावर मात करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची तसेच ग्रामसभेच्या माध्यमातून लोकसहभाग वाढवत गावाचा सर्वांगीण विकास साधल्याची माहिती देण्यात आली आहे. एकेकाळी दुष्काळ, पाण्याची टंचाई आणि स्थलांतर यांसारख्या गंभीर समस्यांनी ग्रासलेले हिवरे बाजार आज देशातील आदर्श गाव म्हणून ओळखले जाते.

हिवरे बाजारच्या या उल्लेखामुळे केवळ गावाचाच नव्हे, तर अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्य व देशाचा नावलौकिक देशभर पोहोचला आहे. ग्रामीण विकास, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि लोकसहभागाच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणणाऱ्या हिवरे बाजारच्या कार्याला मिळालेली ही राष्ट्रीय पातळीवरील आणखी एक मोठी दाद मानली जात आहे.

### कुतुबमिनारवर हिवरे बाजारची झलक

दिल्लीतील कुतुबमिनार येथे दररोज सादर होणाऱ्या लेझर शोमध्ये भारतातील प्रेरणादायी व्यक्ती, संस्था आणि गावांच्या यशोगाथा दाखविल्या जातात. देश–विदेशातील हजारो पर्यटक हा शो पाहतात. या चित्रफितीत हिवरे बाजारच्या जलसंधारण, पाणी नियोजन, लोकसहभाग आणि शाश्वत ग्रामविकासाच्या कार्याचा समावेश झाल्याने गावाच्या विकास मॉडेलला राष्ट्रीय व्यासपीठ मिळाले आहे.

### दुष्काळग्रस्त गाव ते आदर्श गाव

एकेकाळी दुष्काळ, पाणीटंचाई आणि स्थलांतरासाठी ओळखले जाणारे हिवरे बाजार आज देशातील आदर्श गावांपैकी एक म्हणून प्रसिद्ध आहे. पद्मश्री पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली जलसंधारण, वृक्षसंवर्धन, पाणी नियोजन, श्रमदान आणि लोकसहभागाच्या माध्यमातून गावाने विकासाची नवी दिशा निर्माण केली. आज हिवरे बाजारचे विकास मॉडेल देशातील अनेक राज्यांसाठी अभ्यासाचा आणि प्रेरणेचा विषय बनले आहे.



तोफखाना नवरंग व्यायामशाळा परिसरातील रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

# तोफखाना नवरंग व्यायामशाळा परिसरातील रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन संपन्न

नगर – शहरातील तोफखाना नवरंग व्यायामशाळा परिसरातील रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन नुकतेच पार पडले. या कामामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला रस्त्याचा प्रश्न मार्गी लागणार असून परिसराच्या विकासाला नवी गती मिळणार आहे.

यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले, महापालिका निवडणुकीत भाजप–राष्ट्रवादी कॉंग्रेस युतीला नागरिकांनी विकासाच्या मुद्यावर कौल दिला असून त्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही. शहरातील प्रत्येक प्रभागातील नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देत टप्प्याटप्प्याने सर्व विकासकामे पूर्ण केली जात आहेत. रस्ते, पिण्याचे पाणी, वीज, सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छता तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाची ग्रीन सिटी मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. महापालिका ही नागरिकांना सेवा देणारी संस्था असून विकासकामे वेळेत व दर्जेदार व्हावीत, यासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे. पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून शहरातील विविध विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाला आहे. त्या निधीच्या साहाय्याने शहरातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागत असून नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास राजू मामा जाधव, नगरसेविका शितल ढोणे, नगरसेवक सागर मुर्तडकर, महेंद्र बिजा, संजय ढोणे, सुशांत जाधव, सोमनाथ जाधव, नारायण येमुल, चंद्रकांत लिपारे, अनिल आरकल, अंबादास येनगंदुल, कुणाल दुडगु, पांडुरंग येमुल, चेतन आरकल, शुभम गरुड, गणेश शेलार, पप्पू पाथरे, मयूर चखाले, अजय केंजरला आदी उपस्थित होते.

नगरसेविका शितल ढोणे म्हणाल्या, तोफखाना नवरंग व्यायामशाळा परिसरातील रस्ता कॉंक्रिटीकरणाचे काम अनेक दिवसांपासून प्रलंबित होते. या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. आता हे काम तातडीने मार्गी लागत आहे.

# गरजू दंत रुग्णांसाठी यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेजची मोफत बससेवा

नगर – गरजू रुग्णांना दंत उपचारासाठी महाविद्यालयात ये–जा करणे सुलभ व्हावे, या उद्देशाने 'लेट श्री. यशवंतराव चव्हाण मेमोरियल मेडिकल ॲण्ड रुरल डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या डेंटल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, अहिल्यानगर' यांच्या वतीने गरजू रुग्णांसाठी मोफत बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या बससेवेचा मार्ग सकाळी ८.४० वा. कोठला पासून सुरु होईल पुढे तारकपूर रोड, फकीरवाडा, श्रीरामचौक, भिस्तबाग, नागापूर पुल, बोल्हेगाव फाटा, गजानन कॉलनी, सकाळी १० वा. डेंटल कॉलेजवर पोहेचेल. तसेच रुग्णांना उपचारासाठी महाविद्यालयात आणल्यानंतर दुपारी ३ वा. महाविद्यालयातून बस परतीच्या प्रवासासाठी रवाना होईल.

या बससेवेमुळे गरजू रुग्णांना दंत महाविद्यालयात उपचारासाठी येणे व उपचारानंतर सुरक्षितपणे परत जाणे सुलभ होणार आहे. या उपक्रमामुळे शहरातील विविध भागातील रुग्णांना दर्जेदार दंत उपचारांचा लाभ घेता येणार असून, 'रुग्ण सेवा हीच समाजसेवा' या भावनेतून महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकीतून मा. यशवंतराव गडाख पाटील यांच्या प्रेरणेतून ही बससेवा सुरु केली आहे.

गरजू रुग्णांनी या मोफत बससेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालय प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्वच्छ वारी... सुंदर वारीचा संदेश देत हरदिन मॉर्निंग ग्रुपची पंढरपूर वारी



वारी मार्गावर स्वच्छता करताना हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य.

नगर – भिंगार येथील हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेली एकदिवसीय पंढरपूर वारी भक्तिभाव, सामाजिक बांधिलकी आणि स्वच्छतेचा संदेश देत उत्साहात पार पडली. विठ्ठल नामाचा गजर, टाळ–मृदंगाचा निनाद आणि अभंगांच्या सुरावटींसह पंढरपूर गाठलेल्या वारकऱ्यांनी स्वच्छ वारी... सुंदर वारी हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला.

भिंगार येथील श्री रोकडेश्वर हनुमान मंदिरात महाआरतीनंतर हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सदस्य पंढरपूरकडे रवाना झाले. संपूर्ण प्रवासात ज्ञानोबा–तुकोबा, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठलच्या अखंड गजराने वातावरण भक्तिमय झाले होते.

या वारीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे स्वच्छतेचा संदेश देत प्रत्यक्ष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. पंढरपूर येथील श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरातील श्री संत नामदेव पायरी परिसरात सदस्यांनी हातात झाडू घेऊन स्वच्छता केली. परिसरातील प्लास्टिक, कचरा आणि इतर टाकाऊ वस्तू गोळा करून मंदिर परिसर स्वच्छ करण्यात आला. यावेळी भाविकांनाही प्लास्टिकमुक्त वारी, स्वच्छ मंदिर परिसर आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने वर्षभर आरोग्य जनजागृती, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, रक्तदान, सार्वजनिक स्वच्छता आणि विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून यंदा ही एकदिवसीय पंढरपूर वारी आयोजित करण्यात आली. धार्मिक कार्यक्रमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

या वारीत संजय सपकाळ, जहीर सय्यद, दिलीप ठोकळ, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, विकास भिंगारदिवे, रामनाथ गर्जे, सतीश सपकाळ, सरदारसिंग परदेशी, अविनाश पोतदार, डॉ. अतुल मडावी, राजेंद्र पांढरे, अशोक लोंढे, अशोक दळवी, नवनाथ वेताळ, जालिंदर अळकुटे, सुहास देवराईकर, मच्छिंद्र बेरड, रमेश साके, किसन गुंजाळ, राजेश तनपुरे, संतोष चोपडा, राजकुमार मोरे, उषाताई ठोकळ, सुरेखा आमले, नीता देवराईकर, उमा सोनसळे, आशाताई गर्जे, अश्विनी थोरात, रजनीताई परदेशी, लक्ष्मीताई गायकवाड, अनिता सोनवणे, योगिताताई, अर्चना खर्से, वर्षा काळे, रजनी परदेशी, निर्मल भिंगारदिवे, देविदास गंडाळ, विलास शिंदे, शब्बीर शेख, गोकुळ भांगे, दर्श गोंधळे, राजाराम थोरात, दत्तात्रय गोंधळे, हिरेंद्र मिश्रा आणि अनिल बनसोडे सहभागी झाले होते.

संजय सपकाळ म्हणाले, आज आम्ही टाळ–मृदंगाबरोबर झाडूही हातात घेतला आहे. कारण स्वच्छता हीच खरी सेवा असून सेवेतूनच ईश्वरप्राप्तीचा मार्ग खुला होतो. वारीनिमित्त सदस्यांनी वारी मार्ग तसेच मंदिर परिसरात स्वच्छता करून भाविकांना कचरा योग्य ठिकाणी टाकण्याचे, प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आणि पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तसेच विठ्ठल चरणी राज्याच्या सुख–शांतीसाठी, सामाजिक ऐक्यासाठी आणि सर्वांच्या समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली.



केंद्र सरकारच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करताना भाकपाचे कार्यकर्ते.

# भाकपाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

नगर – दिल्ली येथील जंतर–मंतरवर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व शास्त्रज्ञ सोनम वांगचुक, विद्यार्थी नेत्या कॉ. नेहा बोरा, अभिजित दिपके व इतर आंदोलनकर्त्यांवर होत असलेल्या कथित लाठीचार्ज व दडपशाहीच्या निषेधार्थ भारतीचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी–लेनिनवादी) लिबरेशनच्या वतीने २१ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करून निषेध नोदविण्यात आला.

आंदोलकांनी शिक्षणमंत्र्यांचा धिक्कार असो, मोदी सरकार हाय हाय, शिक्षण मंत्री राजीनामा द्या, आंदोलनकर्त्यांवरील दडपशाही बंद करा, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या सरकारचा धिक्कार असो... अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. निदर्शनानंतर आंदोलकांच्या वतीने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जिल्हाधिकारी कार्यालयातील गृह शाखेचे नायब तहसीलदार मयूर बेरड यांच्या मार्फत निवेदन पाठविण्यात आले आहे.

या आंदोलनात कॉ. राजेंद्र बावके, कॉ. राजू वैराळ, कॉ. मदिना शेख, कॉ. जीवन सुरुडे, कॉ. विनायक गोरखे, अनिल बोरसे, आकाश शिंदे, आसरू बर्डे, विजय राहींज, गणपत जाधव, बाळासाहेब खाडे, भास्कर जाधव, शिवाजी पवार, बजरंग गुंड, राहुल पवार आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

निवेदनात सोनम वांगचुक, कॉ. नेहा बोरा व इतर आंदोलनकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. तसेच नीट, यूजीसी–नेट, टीईटी, पोलीस भरती व इतर स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणांची स्वतंत्र न्यायिक चौकशी करावी, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, पेपरफुटीविरोधी कठोर कायदा करावा, पाशवी बळावर लोकशाहीची गळचेपी थांबवा, शिक्षणाचे व्यापारीकरण थांबवावे, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

# आषाढी एकादशीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

## अरणगाव येथे धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



नगर – अहिल्यानगर तालुक्यातील श्रीक्षेत्र अरणगाव येथे आषाढी एकादशी व द्वादशी यात्रेनिमित्त सद्गुरू श्री बुवाजी बुवा महाराज यांच्या संजीवन समाधीस्थळी दरवर्षीप्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पांडुरंग परमात्मा द्वादशीचा उपवास सोडण्यासाठी श्रीक्षेत्र अरणगाव येथे येत असल्याची आख्यायिका असून, १९ ते २६ जुलै या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांनी हा सोहळा होत आहे.

सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, विष्णू सहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी प्रवचन, सायंकाळी हरिपाठ, महाआरती, रात्री कीर्तन तसेच गोपाळकाला आणि जागरणाचा कार्यक्रम होणार आहे. या सप्ताहात ह.भ.प. अशोक महाराज सातपुते, योगेश महाराज खेडेकर, मधुकर महाराज भोगांडे, हंसराज महाराज, निवृत्ती महाराज गुंजाळकर आणि राजाभाऊ महाराज मोरे यांची कीर्तने होणार आहेत. तसेच दररोज महाप्रसाद, भजन, प्रवचन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

२५ जुलै रोजी पहाटे अश्वपूजन व पालखी सोहळा होणार असून, २६ जुलै रोजी महापूजा, रथ मिरवणूक आणि यात्रा महोत्सव उत्साहात साजरा केला जाणार आहे. या दिवशी बाळासाहेब जाधव, महेश गहिले आणि संजय भाटी (शिरूर) यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. २९ जुलै रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त अमोल महाराज जाधव यांचे कीर्तन होणार असून, त्यानंतर अर्जुन दामू शिंदे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्याचे आयोजन पांडुरंग बुगाजी बुवा समाधी देवस्थान ट्रस्ट, श्रीक्षेत्र अरणगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. यात्रेसाठी रथसजावटीमध्ये प्रविण पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

रथयात्रेपूर्वी अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे अध्यक्ष रमेश जंगले, राजू प्रसाद, मेहेरनाथ कलचुरी, दत्त देवस्थान सत्संग मंडळ, अहिल्यानगर, सुजय विखे, आमदार काशिनाथ दाते, जगन्नाथ देवकर, अभय आगरकर, आमदार संग्राम जगताप, जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले, सुवर्णा कोतकर, जाल पी. दस्तूर, यौहान साहब, राजेंद्र मेहेर तसेच ट्रस्टचे अध्यक्ष नवनाथ गहिले, उपाध्यक्ष नाना करांडे, सर्व विश्वस्त आणि ग्रामस्थ यांच्या हस्ते रथपूजन होणार असून त्यानंतर रथयात्रेला प्रारंभ होईल.

# रामवाडी झोपडपट्टीत एसआयआरचे ८० टक्के काम पूर्ण



रामवाडी येथे मतदाराचे अर्ज भरुन घेताना बीएलओ.

नगर – भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या विशेष मतदार यादी सखोल पुनर्निरीक्षण (एसआयआर) अभियानांतर्गत अहिल्यानगर शहरातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रामवाडी परिसरात तब्बल ८० टक्के पडताळणीचे काम पूर्ण करण्यात यश आले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि विविध अडचणींवर मात करत हे काम यशस्वी करणारे बीएलओ महेश क्षीरसागर आणि आसाराम गुंड यांच्या कार्याचा रामवाडीतील नागरिकांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

रामवाडी परिसरात मोठ्या प्रमाणावर कचरा वेचक, असंघटित क्षेत्रातील कामगार, रोजंदारी मजूर, ज्येष्ठ नागरिक तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबे वास्तव्यास आहेत. येथील बहुतांश नागरिक सकाळी लवकर कामासाठी घराबाहेर पडतात आणि रात्री उशिरा घरी परततात. त्यामुळे विशेष मतदार पुनर्निरीक्षण मोहिमेअंतर्गत त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पडताळणी करणे हे मोठे आव्हान ठरत होते. याशिवाय एसआयआर मोहिमेबाबत विविध अफवा आणि गैरसमज पसरल्याने अनेक नागरिक संभ्रमात होते. काही नागरिकांना पडताळणी प्रक्रियेबाबत चुकीची माहिती मिळाल्यामुळे ते सहकार्य करण्यासही साशंक होते. अशा परिस्थितीत बीएलओ महेश क्षीरसागर आणि आसाराम गुंड यांनी नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधला. त्यांनी नागरिकांच्या शंकांचे निरसन करून योग्य माहिती दिली तसेच मतदानाचा हक्क आणि मतदार यादीतील नावाचे महत्त्व समजावून सांगत नागरिकांचा विश्वास संपादन केला.

केवळ कार्यालयीन वेळेपुरते मर्यादित न राहता नागरिक ज्या वेळेत घरी उपलब्ध असतील त्या वेळेनुसार दोन्ही बीएलओंनी पहाटे तसेच रात्री उशिरापर्यंत घरोघरी भेटी दिल्या. निरक्षर नागरिकांचे अर्ज भरून देणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून देणे, प्रक्रियेची माहिती समजावून सांगणे आणि कोणताही पात्र मतदार वंचित राहू नये यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे रामवाडी परिसरातील सुमारे ८० टक्के एसआयआर पडताळणीचे काम पूर्ण होऊ शकले.

सामाजिक कार्यकर्ते विकास उडानशिवे म्हणाले, अहिल्यानगर शहरातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीत एसआयआरचे काम पूर्ण करणे हे मोठे आव्हान होते. नागरिक रोजंदारीच्या कामासाठी बाहेर असल्याने त्यांना भेटणे कठीण होते. त्यातच एसआयआर संदर्भात अनेक अफवा पसरल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत अफवांचे निरसन करून नागरिकांचा विश्वास संपादन करणे हे अत्यंत जिकिरीचे काम होते. मात्र बीएलओ महेश क्षीरसागर आणि आसाराम गुंड यांनी नागरिकांच्या सोयीच्या वेळेनुसार पहाटे आणि रात्री भेटी देत अत्यंत प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि सेवाभावाने काम केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे रामवाडीतील सुमारे ८० टक्के एसआयआरचे काम पूर्ण झाले आहे.

यावेळी रामवाडीतील नागरिकांच्या वतीने बीएलओ महेश क्षीरसागर आणि आसाराम गुंड यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारप्रसंगी मनोहर चाखले, बाळुराम खुडे यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते.

# प्रेम भारती नगर येथे सुमारे ४५ लाखांच्या बौद्ध विहाराचे भूमिपूजन

## आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नांना यश



प्रेम भारतीनगर येथे बौद्ध विहाराच्या कामाचे भूमिपूजन करताना कुमारसिंह वाकळे, बाबूशेठ नागरगोजे, सुरेश बनसोडे, सुनीता भिंगारदिवे, आशाताई कातोरे आदी.

नगर – प्रभाग क्रमांक ८ मधील प्रेम भारतीनगर येथे आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून आणि मनपा स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सुमारे ४५ लाख रुपये खर्चाच्या बौद्ध विहाराच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या कामामुळे परिसरातील नागरिकांना धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक उपक्रमांसाठी स्वतंत्र वास्तू उपलब्ध होणार आहे.

यावेळी मनपा स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे, नगरसेवक बाबूशेठ नागरगोजे, नगरसेवक सुरेश बनसोडे, नगरसेविका सुनीता भिंगारदिवे, आशाताई कातोरे, किसन भिंगारदिवे, सुनील भालेराव, पंकज लोखंडे, सनी कदम, उत्तम भिंगारदिवे, योगेश भोसले, बाळासाहेब गायकवाड, रवी चाबुकस्वार, शिवाजी भोसले, बाबासाहेब डोळस, उत्तम आडसुळ, रमेश पगारे, रामदास धिवर, रमेश सूर्यनारायण, सचिन कदम, आकाश देशमुख, रोहित वाकळे, अक्षय वाटमोडे, रामदास खरात, महेश वैद्य, बाळू बनकर, गौरव भिंगारदिवे, अलका पगारे, माया जाधव, सारिका गांगुर्डे, दिपाली भोसले, अनिता नांगरे आदी उपस्थित होते.

मनपा स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे म्हणाले, बोल्हेगाव आणि नागापूर या गावांना नियोजनबद्ध विकासकामांच्या माध्यमातून शहरीकरणाचे रूप प्राप्त करून देण्यात आले आहे. कायमस्वरूपीची विकासकामे झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर नागरिक येथे वास्तव्यास येत आहेत. या सर्व विकासकामांसाठी आ. संग्राम जगताप यांनी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून मोलाचे सहकार्य केले आहे. प्रभागातील मूलभूत प्रश्नांपासून विकासकामे मार्गी लावण्यात आली असून आता काँक्रिटीकरणाच्या रस्त्यांची कामे सुरू आहेत. दहा वर्षांपूर्वी या परिसरात कोणतीही विकासकामे नव्हती. शून्यापासून विकास करण्याची वेळ आली होती. मात्र आज नियोजनबद्ध विकासामुळे संपूर्ण प्रभागाचा कायापालट होत असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

नगरसेविका सुनीता भिंगारदिवे म्हणाल्या, कुमारसिंह वाकळे यांनी विकासकामांच्या माध्यमातून संपूर्ण प्रभागाचा चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व जाती–धर्मातील नागरिकांचा विश्वास त्यांनी संपादन केला. त्यांच्या पाठपुराव्यामुळे बौद्ध विहाराचे काम मार्गी लागत असून भविष्यात या ठिकाणी विविध धार्मिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर आयोजित केले जातील.

नगरसेवक बाबूशेठ नागरगोजे म्हणाले, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांबरोबरच विकासकामांना प्राधान्य देण्यात येत आहे. कुमारसिंह वाकळे यांच्या माध्यमातून प्रेम भारती नगरमध्ये भव्य बौद्ध विहार उभा राहत असून हा समाजासाठी अभिमानाचा विषय आहे.

नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, समाजाला एकत्र येण्यासाठी आणि विविध धार्मिक–सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी बौद्ध विहाराची निर्मिती होत आहे. या महत्त्वपूर्ण कामासाठी आमदार संग्राम जगताप आणि कुमारसिंह वाकळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी कुमारसिंह वाकळे यांनी सातत्याने प्रयत्न केले असून त्याचे सकारात्मक परिणाम आता नागरिकांना दिसून येत आहेत.

# नीट पेपरफुटीविरोधात काँग्रेसची नगर शहरात ‘स्वाक्षरी मोहीम’

## विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी संघर्ष तीव्र करणार : दीप चव्हाण



नगर – नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता आणि विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहर काँग्रेसच्या वतीने विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्यात येणार असल्याची माहिती शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी दिली.

देशभरातील विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असताना केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) यांची भूमिका अत्यंत निराशाजनक असल्याचा आरोप त्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित इतका गंभीर विषय असतानाही केंद्र सरकारने कोणतीही नैतिक जबाबदारी स्वीकारलेली नसल्याची टीकाही त्यांनी केली.

या पार्श्वभूमीवर काँग्रेसतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उद्देशून खुले पत्र प्रसिद्ध करण्यात येणार असून, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यामध्ये करण्यात येणार आहे. तसेच परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणून विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी व्यापक सुधारणा करण्याची मागणीही या पत्रातून केली जाणार आहे. याचबरोबर शहरातील विविध शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये ‘विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी स्वाक्षरी अभियान’ राबविण्यात येणार आहे. या अभियानासाठी १० बाय २० फूट आकाराच्या विशेष फलकावर पंतप्रधानांना उद्देशून खुले पत्र प्रसिद्ध करण्यात येईल. उर्वरित जागेवर विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात येणार असून, त्या राष्ट्रपती, पंतप्रधान आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती दीप चव्हाण यांनी दिली.

या अभियानाचा भाग म्हणून शहरातील विविध भागांत जनजागृती रॅली, विद्यार्थी संवाद, स्वाक्षरी शिबिरे आणि नागरिकांशी प्रत्यक्ष संपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. शिक्षण हा राजकारणाचा विषय नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न असल्याने सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी या लोकशाही आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन दीप चव्हाण यांनी केले.

धर्म, जात आणि इतर वादग्रस्त विषयांवर राजकारण करण्याऐवजी देशातील विद्यार्थ्यांच्या भविष्याचे संरक्षण करणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी परीक्षा व्यवस्थेत आमूलाग्र बदल करणे ही काळाची गरज आहे, असेही दीप चव्हाण यांनी स्पष्ट केले.

# सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ २४ जुलैला नगरमध्ये ‘एकदिवसीय अन्नत्याग आंदोलन’

नगर – पर्यावरणवादी, वैज्ञानिक आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनावर केंद्र सरकारकडून दडपशाही केली जात असल्याचा आरोप करत, त्यांच्या समर्थनार्थ २४ जुलै रोजी देशभरातील तसेच परदेशात वास्तव्यास असलेल्या भारतीयांनी ‘एकदिवसीय अन्नत्याग आंदोलन’ करावे, असे आवाहन पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने करण्यात आले आहे.

हे आंदोलन हुकूमशाही प्रवृत्तीच्या विरोधात असून लोकशाही, संविधान, अहिंसा आणि नागरिकांच्या शांततामय आंदोलनाच्या घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणासाठी असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले आहे. या आंदोलनासाठी कॉम्रेड बाबा आरगडे, ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, ॲड. सुरेश लगड, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले आणि प्रकाश गोसावी आदी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



केडगाव येथून श्री गणेश पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले.

# केडगाव येथून श्री गणेश पायी दिंडी सोहळ्याचे पंढरपूरकडे प्रस्थान

नगर – केडगाव येथून सालाबाद प्रमाणे श्री गणेश पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पूजन होवून दिंडी मार्गस्थ झाली. यावेळी विठ्ठलनामाच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. ज्ञानोबा–तुकोबा, माऊली... माऊली... या जयघोषात टाळ–मृदंगाचा निनाद, वारकऱ्यांचा उत्साह आणि भक्तीचा अविस्मरणीय सोहळा रंगला होता.

दिंडीचे आयोजक रामदास महाराज शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या पायी दिंडी सोहळ्याप्रसंगी नगरसेवक दत्ता गाडळकर, नगरसेवक सुजय मोहिते, नंदकुमार बोरुडे, दिंडी चालक ह.भ.प. गणेशानंद महाराज शेंडे, सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिंडीचे आयोजक रामदास महाराज शेंडे म्हणाले की, केडगाव परिसरातील रभाजी नगर येथून ही दिंडी प्रस्थान करते. दिंडी अत्यंत शिस्तबद्ध असून, आचार विचार व उच्चार या आधारावर भाविक भक्त चालत राहतात. वारकरी संप्रदायासाठी आस्था असणारे ठिकाण पंढरपूर याकडे जाण्याची गोडी आणखी वाढण्यासाठी आयोजक नेहमी कटिबद्ध आहे. या दिंडीमध्ये सर्वात जास्त महिलांचा सहभाग असतो.

महिलांसाठी सर्व स्वतंत्र व्यवस्था असून, इतर भाविक देखील दिंडीत भक्तीचा आनंद घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

# भिस्तबाग महाल परिसरातून कारची चोरी

नगर – शहरातील सावेडी उपनगरात असलेल्या भिस्तबाग महाल जवळील रामनगर परिसरातील नायरा पेट्रोलपंपाच्या मागे असलेल्या मोकळ्या जागेतून पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट व्हीडीआय कार (क्र. एम.एच. ४८ पी ८३१७) अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना समोर आली आहे. १९ जुलै रोजी रात्री साडेअकरा ते २० जुलै रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. याबाबत दत्तात्रय गंगाधर हराळे (वय ४३, रा. नायरा पेट्रोलपंपामागे, भिस्तबाग महाल, रामनगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे दाजी अर्जुन तुळशीराम कदम यांची ही कार होती. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

